# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००६ |
| वर्ष | : | सातवे |
| अंक | : | ८ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १०७**

MAHMAR 19356/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष ११ावे / अंक ८ / जुलै २००६

## संपादकीय

## नवे काही दिशान्वित व्हावे

'व्ही. पी. एम्. दिशा' च्या अकराव्या वर्षाचा हा पहिला अंक सादर करताना आम्हाला समाधान वाटत आहे. वैचारिक, विचारांना चालना देणारे, (व तेही मराठीतून) चांगले मासिक शैक्षणिक संस्थेने देण्याचा हा पहिलाच प्रयोग आहे. आजवरचे अनुभव लक्षात घेऊन अधिक चांगला अंक कसा देता येईल ही आमचा प्रयत्न असणार आहे. दिशाचे वर्गणीदार, देणगीदार होऊन आणि मुख्यत: लेखक होऊन आपण दिशाचा दर्जा वाढविण्यास हातभार लावावा ही कळकळीची विनंती आहे.

अनेक वाचक प्रत्यक्ष भेटीत दिशातील लेखांबद्दल समाधान व्यक्त करतात. नवनवीन विषयाची माहिती यावी अशी अपेक्षा करतात. अशा वाचकांनी तर दिशासाठी लिहायलाच हवे. अडीच शे रुपये वर्गणीत वर्षाकाठी ४८०-५०० पृष्ठे आम्ही आपणास देतो. घरातील सर्वांचे अंकाचे वाचन झाले की नंतर रुग्णालयांमध्ये जेथे रुग्ण बसतात तेथे तो अंक ठेवा, वाचनालयाला देणगीदाखल द्या वा संच बांधणीकरून स्वत:चे ग्रंथालय वाढवा. दिशा हा प्रयत्न जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचावा हा या विनंती मागील हेतू आहे.

विषयांचे विशेषीकरण झाल्याने त्या त्या विषयातील दर्जेदार नियतकालिके निघतीलच, पण सामान्य माणसाला त्याच्या दैनंदिन विषयासंबंधात विचार देणारे, माहिती देणारे साहित्य कमी होत जाण्याची भीती आहे. अशा काळात हा प्रयत्न चालू आहे.

तेव्हा अकराव्या वर्षापासून अधिक चांगले साहित्य प्रकाशित करण्याची, तुमच्यातील लेखन करु इच्छिणाऱ्यांनी संधी दिशाला द्यावी. तमसो मां ज्योतिर्गमय - च्या प्रार्थनेनुसार अंधार दूर सारीत उजेडापर्यंत पोहचण्याची अभिलाषा आहे !

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष सातवे / अंक ८ / जुलै २००६

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ११ वे / अंक १ला)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ ११११
२५४१ ३५४६
Email : perfectprints@vsnl.net

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | जीवनाचा पाया एकात्मता | शं.बा. मठ | ३ |
| २) | भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | यशवंत सान | ९ |
| ३) | श्रीमद्भगवद्गीता | आशा भिडे | १७ |
| ४) | दुर्मिळ पुस्तकांच्या जगात | सुषमा पौडवाल | २० |
| ५) | कलेच्या शिबिराला पाठवताना | सौ. मंजिरी दांडेकर | २६ |
| ६) | प्रिय दीदीस | मोहन पाठक | २८ |
| ७) | गीतांबरी | आशा भिडे | २९ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | ३२ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# जीवनाचा पाया एकात्मता

*एका शून्यातून ब्रह्मांड व ब्रह्मांडातील दृश्य, अदृश्य, गोचर अगोचर पसारा निर्माण झाला. या विशाल विश्वात जीवनाचा पाया हा मूलभूत, एकच कसा यासंबंधीचे विवेचन या लेखात मिळेल. - संपादक*

## एकत्वाचा परिचय

जीवनाचा पाया हा एकत्वाचा आहे. एकातून अनेक झाले आहे. एकों हं बहु स्यां (तै. उप) एकं सत् वि प्रा बहुधा वदन्ति। (ऋग्वेद) आधी बिज एकले (संत तुकाराम) एकत्व ही वस्तुस्थिती तर नानाटन हा व्यवहार, तो व्यवहार कल्याणमय आनंद पूर्ण व्हावा यासाठी मानवी जीवनाची धडपड चालू असते. मानव केवळ उपभोगासाठी जगत नाही तर त्याला आनंद पूर्ण कल्याणमयतेची बैठक जीवनात निर्माण करावीशी वाटते म्हणून जगतो. हेच खरे जीवन. या गोष्टीपासून जो विचलित होतो त्या वेळी तो निखळ आनंदापासून वंचित होतो, त्याचे जीवन आरंभी उपभोगामुळे खुललेले वाटले तरी हळुहळु खुरटले जाते. त्याला जीवन नीरस वाटू लागते म्हणूनच आपल्या जीवनात त्याला शिव व सुंदरतेला स्थान असावे असे वाटते. तरच आनंदमय जीवन अनुभविता येईल. या प्रमाणे आपले ही जीवन घडावे असे वाटत असल्यास आपल्याला समग्र जीवनाचा विचार करावा लागेल. जीवनाचे खरे स्वरूप ओळखावे लागेल. जीवनाचा उद्‌गम व विकास कसा होतो व त्याची परिणती कशात होते हे पहावे लागेल. तरच अर्थपूर्ण जगणे होईल. या साठी वेदान्ताचा आश्रय घ्यावा लागेल कारण या ठिकाणी भौतिक शास्त्रे थिटी पडतात.

## उपनिषद् विचार

सर्व अनिश्चित गोष्टी विरहित, शुद्ध, व्यापक अस्तित्वाचे स्वरुप म्हणजे वेदान्त होय, पदार्थ, जीव, मन, आणि आत्मा ही सारी त्या विशाल अस्तित्वाच्या उदरातून व्यक्त झालेली व क्षणोक्षणी होणारी आणि त्याहून भिन्न नसलेली अवस्था होय. त्यालाच ब्रह्म म्हणजे व्यापक तत्व असे म्हटले जाते. सर्व व्यापक, सर्व समावेशक, वस्तु तत्व म्हणजे ब्रह्म होय. उपनिषदात असे म्हटले आहे -

सर्व खलु इदं ब्रह्म। (छंदोग्य ३.१४.२) हे ब्रह्म सर्व व्यापक व सर्व समावेशक तत्व आहे.

अयं आत्मा ब्रह्म।(मांडुक्य - २) हा आत्मा देखील तेच ब्रह्मतत्व होय.

त त्वमसि। (छांदोग्य ६.९.७) तू जीव धारण करणारा देखील तेच आहेस.

अहं ब्रह्मास्मि। (तै त्तिरीय) मी ही त्याच तत्त्वाचा आहे.

ही प्रमुख उपनिषद् वचने आहेत. या व्यतिरिक्त अशी अनेक वचने उपनिषदातून आढळतात. तसेच गीता आदी स्मृती ग्रंथातून या बद्दल सांगोपांग विचार केला आहे.

## ब्रह्मविद्या म्हणजेच अनंताचे शास्त्र

मानवाला स्वरुप जाणीवेची बुध्दिमत्ता देऊन जीवनाच्या अंतिम उद्देशाची दिशा दाखविण्यासाठी ब्रह्मविद्या (अनंताचे शास्त्र) निर्माण झालेली आहे. ब्रह्म वा आत्मा हे दोन्ही पर्यायी शब्द आहेत. आत्मज्ञान वा ब्रह्मज्ञान ही दोनही ब्रह्मविद्येतून संभवतात. अध्यात्म विद्या विद्यानां। हे सर्व विद्यात-शास्त्रात-सार्वभौम असे शास्त्र आहे असे गीतेत म्हटले आहे व आणखी असे ही म्हटले आहे की - अति पवित्र, सर्वोत्कृष्ट, अनुभविण्यास सुखद,

प्रत्यक्ष आचरणात आणण्याजोगे सर्व गुणांनी युक्त आणि शाश्वत असे हे ज्ञान आहे. या ज्ञानाने मानवाचे जीवन उजळून जाते, दिव्य बनते (गीता ९-२) अनादी काळापासून हे ज्ञान परंपरेने पिढ्यान् पिढ्या चालत आलेले आहे. व बदलत्या कालानुरुप योग्य बदलही झालेला आहे. अनेक प्राचीन विचारधारा या जगतीतलावर अवतरल्या, काही काळ नांदल्या, आणि कालांतराने काळाच्या उदरात गडप झाल्या. ऋषींनी हे सूज्ञपणे हेरले आणि बदलत्या काळानुरुप साजेसे स्वरुप या ज्ञानाला दिले.

### वैदिक ऋषी

वेदकाळातील ऋषी सर्वकष ज्ञानाचे चाहते होते. जे सर्व अस्तित्वाच्या मुळाशी आहे अशा त्या अंतिम तत्वाचे आपणास ज्ञान झाले पाहिजे ही त्यांची मनीषा होती, त्यांच्या समोर अशा स्वरुपाची प्रश्न मालिका होती. या विश्वाचे आदिकारण काय असावे ? आपले उगम स्थान काय ? आपण कसे जगतो ? कोणाच्या प्रेरणेने आपण सुख दुःख भोगतो ? आपले अंतिम विश्रांतिस्थानक कोणते ? (किंकारणं ब्रह्म। कुतोस्म जात:। जीवाम केन । क्वच सं प्रतिष्ठा:। अधिष्ठाता केन सुखेतरेषु (श्वेताश्वतर उप. १.१)

ध्यानाच्या माध्यमातून त्यांना असे अनुभवाला आले की ते तत्त्व म्हणजेच 'स्व' अगर प्रत्यगात्मा असून तेच खरे आहे. त्यासच ते तत्त्वज्ञान अगर शक्तिशास्त्र म्हणू लागले. ते एक तेजस्वी आणि सर्व शक्तिमान असून प्रत्येकात आहे. तेच सर्व ज्ञानाचे मूळ आहे. सर्व भावनांचे सर्व इच्छा शक्तीचे तेच मूळ आहे. ते एकमेव अद्वितीय आहे. त्याच्यातच काळ समाविष्ट आहे. आणि तेच सर्व कारणांचे आदी कारण आहे. किंबहुना सर्व मात्र अस्तित्वच ते आहे त्यालाच ब्रह्म म्हणून वैदिक ऋषींनी उद्घोषित केले.

### ब्रह्म विचार म्हणजेच व्यापकतेचा विचार

सकल ब्रह्मांडात अनेक आकाशगंगा आहेत. प्रत्येक आकाश गंगेत सहस्रावधी तारे आहेत. सूर्य आणि त्याची मालिका त्यात नक्षत्रे, पृथ्वी, आदी हजारो वस्तू असून, आकाश, वायु, जल, अग्नी, प्राणी समूह, वनस्पती, वन्य पशु, मनुष्य इत्यादी साऱ्या गोष्टी आहेत. ही सारी त्या व्यापक तत्त्वाचीच विस्तारित झालेली रूपे होत. थोडक्यात ब्रह्म तत्वा खेरीज दुसरे काही नाही. म्हणून ऋषी म्हणते झाले 'सर्व खलु इदं ब्रह्म'। मनुष्य,मन, बुध्दि, प्राण इत्यादीतील मूलवस्तु ही आत्मवस्तूच. ज्या अर्थी मन, प्राण, सर्वपदार्थ आदी ब्रह्मच आहे त्याच अर्थी आत्मा हा देखील दुसरा काही नसून ब्रह्मच आहे असे ऋषींनी उद्घोषित केले. अयं आत्मा ब्रह्म इति ।

अनादी कालापासून मानवाचा शोध चालू आहे. कोण बरे या विश्वाचा आणि आपला नियंता असू शकेल? या साठी त्यानी अनेक वस्तूत, अनेक ठिकाणी, अनेक शक्तीत वा देवतात, शोध घेण्याचा प्रयास केला. अशा प्रकारे धांडोळा घेणाऱ्या मानवाला उद्देशून उपनिषदांनी सांगितले - अरे मानवा व्यर्थ का शिणतोस ? जे तू शोधतो आहेस तेच तू आहेस. 'तत् त्वं असि'। तूच ते ब्रह्म आहेस ज्या वेळी याची जाण झाली व त्याच्या लक्षात आले की आपल्यातच आपण स्वत:च तेच आहोत, तेव्हा अनुभवाचे उद्गार बाहेर पडले 'अहं ब्रह्मास्मि'।

### ब्रह्माचे स्वरुप

जे ब्रह्म सर्वांचे कारण आहे त्याचे स्वरुप कसे आहे याचा शोध घेण्यात आला. उपनिषद् ऋषींनी असे म्हटले - ते सत् चित् आनंद आहे. सत् म्हणजे असणे, अस्तित्व चित् म्हणजे जाण आणि आनंद म्हणजे सहज स्थिती (भौतिक सुखदु:खाच्या अतीत असलेली अवस्था) सत् - सर्व दृश्य आणि अदृश्य, संपूर्ण विश्व याने व्याप्त आहे. ब्रह्म हे निराकार आहे. अरूप अनन्त असून सान्त होण्याची किमया लाभलेले, आणि स्थलकालातीत असून, स्थल काळाने मर्यादित होऊ शकणारे, सर्व दृश्य रुपे अवकाशात सामावून घेणारे असे जे तत्त्व ते सत् होय.

चित् - ब्रह्म स्वयंवेदा आहे, अमर्याद गतिमानता असलेले, गतीलाच शक्ती म्हणतात. या गतिमानतेमुळेच पदार्थांची जडण घडण होते. हे निराकार, व्यापक, अवकाश अशा अनेक शक्तींनी व्याप्त आहे. ही शक्तीच विविध रुपे धारण करते. पृथ्वी, जल, तेज, वायु आणि आकाश ही सारी त्या तत्वानेच घडतात. कारण तेच स्थायी व अनेक गुणांनी युक्त असे तत्त्व आहे (श्वेताश्व) आनंद - मनाची सहज स्थिती. सुखदु:खातीत अवस्था. थोडक्यात आपल्यातच रममाण झालेले तत्त्व.

**प्रकृती -**

ब्रह्माचे स्वरुप सत् चित् आनंदमय आहे आणि ते सर्व शक्तीचे कारण आहे. ते गतिमान आहे. गतीमुळेच सर्व चेतन व अचेतन पदार्थ बनतात. शक्तीच्या उत्कट अवस्थेत ब्रह्माची गती जोर धरते आणि ती गतीची विविधरुपे धारण करते. म्हणजेच हरपतेच्या अवस्थेत येऊन मर्यादित होते. अशा प्रकारे उत्पत्तीला सुरुवात होते (श्वेताश्वतर उप.) काही वेळा ही गती मंद होते आणि म्हणून मूळ गतीपेक्षा वेगळी होते. यातून वेगळे दृश्य घटक, मर्यादित घटक बाजूला होतात. यालाच 'पिंड' असे म्हणतात. हे ब्रह्माचेच घटक होत. संपूर्ण ब्रह्मांड अशा पिंडानी भरलेले आहे. म्हणूनच म्हटले जाते 'पिंडी ते ब्रह्मांडी' हिलाच प्रकृती, उत्पत्ती अथवा पदार्थ म्हणतात.

पिंड हा ब्रह्माचा मूळ घटक या पिंडामुळेच अणु निर्माण होतात म्हणजे पिंड अतिसूक्ष्म असते. अणू मुळे द्वयणुक, त्र्यणुक, इत्यादी कण तयार होतात व त्यांच्या संघाताने (एकत्र येण्याने) आकार घडतात. त्यातून पदार्थांची निर्मिती होते. प्रकृती वा निसर्ग यालाच म्हणतात कैवल्य उपनिषदात म्हटले आहे मी अणूहून अणू व महत् हून महत् आहे' 'अणो : आणीयान् महतो महीयान्' ब्रह्मगती मधूनच पिंड आणि स्पंद पण निर्माण होतात. पिंडामुळे पदार्थ बनतात. ब्रह्म सतत गतिमान असल्याने पदार्थ फक्त गतीतच स्थिर असतात. गती हीच शक्ती. शक्ती आणि पदार्थ एकमेक बदलू शकतात. शक्तीचे रूपांतर पदार्थात व पदार्थाचे रूपांतर शक्तीत होते. ही ब्रह्म शक्तीच असल्याने पदार्थातील गतिमानताही शाश्वत स्वरुपाची असते, इतकेच नव्हे गतीच्या शाश्वततेमुळे पदार्थ देखील अविनाशी आणि अमर्याद आहे. उत्पत्ती वाचून कोणताही क्षण असणार नाही. म्हणून उत्पत्ती अनादी आणि अनंत आहे. सर्व विश्व निर्माण करणारी आहे. अनेक रुपांनी नटणारी आहे. सर्वांना व्यापणारी आहे. अशा त्या अनंताला ओळखल्यास मानव सगळ्या बंधनातून मुक्त होतो (मुच्यते सर्वपाशै:) (श्वेताश्वतर५.१३)

**जीव-**

आपल्या आंनद स्वरुपात ब्रह्माने हे निसर्ग आणि निसर्गच सर्वांना 'जन्मदायी' झाले. मदतु निर्माण झाले. निर्मितीची संभाव्यता झाली जाणिवेचेच जीवात रूपांतर झाले. याची अनेकविध आणि अनेकरूपे झाली. ब्रह्मापासून निसर्ग, निसर्गापासून जीवोत्पत्ती म्हणून जीव म्हणजे ब्रह्म 'प्राणो ब्रह्म इति व्यजानात्' (तैत्तिरिय उप. ३.३) जीव हा शरीरातील महत्वाचा भाग आणि गर्भ धारणेने हा शरीरात प्रविष्ट होतो. प्राण असेल तर उत्पत्ती आणि नसले तर सगळे शांत.

**मन-**

मनुष्य ही निसर्गाची अंतिम अवस्था आहे. पशूत आणि मानवात फरक मनाच्या ठेवणीत आहे. मनुष्याला जाणीव होते. तो स्मरण करू शकतो. त्याला सुखदु:खाची जाण येते. तो निश्चय करू शकतो चांगले वाईट याची निवड करू शकतो हे प्राण्याला जमत नाही. तो निसर्गा विषयी विचार करू शकतो कारण त्याच्या ठिकाणी असलेल्या मन:शक्तीमुळे. थोडक्यात ब्रह्मा पासून प्रकृती, प्रकृतिपासून मानव म्हणजे विचार शील मन म्हणून उपनिषदे् म्हणतात- 'मनो ब्रह्म इति'।

## अस्तित्व-

सत अगर अस्तित्व, असणेपणा हे प्रत्येक घटकात स्वाभाविकच आहे. मग ती सजीव असो वा नसो. प्रत्येक वस्तु अस्तित्वासाठी झगडते व विनाशाला विरोध करते. आणि हेच जीवनाचे प्रमुख अंग आहे. प्रदीर्घ जीवानासाठी माणूस झगडतो. कर्मआचरतो. निसर्गावर मात करतो. स्वत:ल उपयुक्त खाद्य, अन्न, पाणी, निवारा संरक्षण ही प्राप्त करून घेतो हा भाव वन्य पशु, तसेच पशु पक्षी यातही असतो. मानव आपल्या मानसिक शक्तीच्या द्वारे निसर्गाशी नित्य झगडतो. त्यामुळे त्याची ताकद वाढते. त्यातून त्याचे जीवन सुरळीत चालण्यास मदत होते. मानव उभा राहू शकतो, चालू शकतो. त्याचे हात काम करण्यासाठी मोकळे असतात. ही मानवाला इतर प्राण्याहून वेगळी मिळालेली देणगीच आहे. त्यामुळे त्याच्या आवाक्याची शक्ती वाढली आहे. निसर्गावर मात करणे त्याला सोपे जात आहे.

## सत्य शिव सुंदरम् -

सत्य, शिव आणि सुंदर ह्या गोष्टी मानवाच्या जीवन प्रवाहाशी निगडितच आहेत. मानवी इतिहास हेच सांगतो की अनादी काळा पासून आज तागायत मानवाची धडपड याच तीन गोष्टी साठी होत राहिला आहे. ती गोष्ट अधिकाधिक आंतरीक जीवनात फुलवत जगणे हाच खरा जीवन प्रवाह.

केवळ दीर्घ जीवन मानवाला अपुरे वाटते. कारण ती अगदीच निम्नश्रेणी आहे. पशूंना देखील दीर्घ जीवनाबद्दल ओढ असते कोणालाच जीवन लवकर संपावे असे वाटत नाही. त्याला केवळ सुखसोयीनी युक्तजीवन नीरस वाटते. चांगुलपणा आणि सौंदर्य ही जीवनाची प्रमुख अंगे आहेत. पोटा पाण्याची विवंचता सुटल्याबरोबर त्याला मिळणाऱ्या मोकळ्या वेळेत आपला जीवन प्रवाह कसा सुंदर होईल इकडेच तो लक्ष पुरवितो. अन्न, वस्त्र निवारा, वाहतुकीची व्यवस्था आणि अशाच अनेक गोष्टी याने त्याचे जीवन सुखकर होते. इतके प्राप्त झाल्यानंतर तो स्वत:च्या अंतरंगाकडे वळतो. तो विश्वाशी नाते जोडतो आणि आपण कोण आहोत याचा विचार करतो. हा मानव भौतिक जीवनाच्या पलिकडे असलेल्या आंतरिक जीवनाकडे जाण्याचा सतत प्रयत्न करतो. अशा प्रकारे सत्य, शिव, सुंदर हे त्याच्याच ठिकाणी दडलेले असते यालाच जीवन प्रवाह असे म्हणतात.

या धडपडीतून तो सतत सत्य, शिव, सुंदरतेकडे धाव घेत असतो. या भूमिकेतूनच तो समाज बांधतो आणि बदल घडवून आणतो. नीतिमत्ता प्रस्थापित करतो, कालानुरुप बदलतो, कायदे तयार करतो, धर्म प्रस्थापित करतो, अधर्म नाहीसा करतो, सामाजिक पद्धती निर्माण करतो, वेळोवेळी बदल करतो, या प्रमाणे जीवन प्रवाहात सतत बदल घडत असतात आणि जीवनाला उपयुक्त ते टिकते. अनुपयुक्त नाहीसे होते. यातून जीवन प्रवाह सतत प्रवाहित राहते. जुने नाहीसे होते नव्यांना जागा करून देते. संपूर्ण मानवी जीवन याची साक्ष आहे.

असा हा कधीही न संपणारा जीवन प्रवाह अव्याहत चालू आहे. क्षणाक्षणाला नित्यनूतन होत असल्याने आणि मानवाचे सारे व्यवहार त्याशी संलग्नित असल्याने त्या गतीबरोबर त्याला जुळवून घ्यावेच लागते. सामाजिक, राजकिय, नैतिक, आध्यात्मिक, जीवनातील मूल्ये, कायदे या सर्वांनाच या गतीशी जुळवून घेणे अगत्याचे आहे. कालधर्मानुसार हा बदल घडलाच पाहिजे. याच्याशी जुळवून घेणे ज्यावेळी क्रम प्राप्त होते तेव्हा जुने जाते व नवी पद्धत येते. जे मानवी जीवन अधिक सुंदर व्हावे असे इच्छितात तेच खऱ्या अर्थाने जीवन प्रवाहबरोबर असलेला सत्य, शिव, सुंदरते कडे नेऊ शकतात. असे वागणे म्हणजे त्या परमतत्वाशी समरसतेने वागणे असे होईल. यालाच सत् चित् आनंद म्हणतात.

**संपूर्ण जीवनच आध्यात्मिक-**

आध्यात्मिक जीवन म्हणजे या ब्रह्मतत्वाला साजेसे जीवन जगणे होय. अमर्याद तत्त्व सान्ताशी (मर्यादिततेशी) कसे वागते हे पाहून आपला जीवनाचा अर्थ ध्यानी घेणे, जीवन जगणे म्हणजे या धर्माने वागणे. स्वत:त बदल घडविणे, इतरांच्या जीवनास चालना देणे. बाह्य जगतातील व्यवहार नीतिमत्तेचा असणे आवश्यक सभ्यता, अद्वेष इत्यादी गोष्टी जीवनात असाव्यात, स्वत:चे जीवन योग्य असे घडवून इतर घटकांना उपकृत होईल, मानवधर्म पाळला जाईल व त्यातून जीवन मूल्ये विकसित होतील हे पाहाणे म्हणजेच खरे आध्यात्मिक जीवन. अन्नभक्षण करताना देखील याची जाण मानवाला झाली पाहिजे. अन्न सेवन हा केवळ उपभोग नसून, एक प्रकारचा श्रेष्ठ यज्ञ आहे. कारण या अन्नाचे रुपांतर कारणारा तो घटक असतो, भौतिक पदार्थाचे सूक्ष्म मानसिक स्तरातले तो करत असतो. तो बदल घडवून आणणारा एक ऋषी आहे, वैज्ञानिक आहे. वनस्पती माती, पाणी प्रकाश शोषून घेऊन त्याचे सुगंधी फुलात व गोड फळात रुपांतर करते आणि सर्वांना उपकृत करते. त्याच प्रमाणे या अन्नाचे शुद्ध विचारात शुद्ध आचारात मानवाने रुपांतर केले पाहिजे. म्हणून अन्न खाणे ही क्रिया देखील आध्यात्मिक व्हावी. याच साठी भोजना पूर्वी प्रार्थना म्हणून ब्रह्माची आठवण ठेवावी आणि त्याला या भौतिक पदार्थांचे शुद्ध मन विचार यात बदल घडवून आणण्यास साहाय्य करणासाठी विनवावे.

मानवाच्या आर्थिक धडामोडी या जीवन सुधारण्यासाठी व सुंदर करण्यासाठीच आहेत. म्हणून मानवाने आर्थिक व्यवहार एक आध्यात्मिक जीवनाचा भाग आहे, म्हणून करावे. निसर्गाचा अभ्यास आणि तांत्रिक शिक्षण याने सुबत्ता वाढविण्यास आणि व्यापार वृद्धीस मदत होते. या साऱ्या खटाटोपाचा उपयोग ब्रह्म कर्माशी अनुरूप झाल्यास त्या जीवन प्रवाहाशी सुयोग्य वर्तन होईल. उत्पादन ही जीवनात सुख सोयी वृध्दिंगत करण्यास मदत करते. प्रत्येक प्राणिमात्राशी याचा संबंध येतो. म्हणून मानवाला सामाजिक जीवन जगणारा प्राणी म्हणतात. वितरणाचा व्यवहार देखील सुलभ व सौकर्याने झाल्यास उद्योगधंदे देखील आध्यात्मिक होऊ शकतील. ही जाणीव हाच धर्म हीच आध्यात्मिकता राजकारणही आध्यात्मिक बनवता येईल. राजकारणचा राजसत्ताजीवनाला योग्य वळण लावण्यासाठी असणारी एक शक्ती, हे ध्यानात घेतले पाहिजे. या द्वारे मानवाचे सामाजिक, सांस्कृतिक जीवन सुधारून भौतिकतेच्या पलीकडे, अंतरंगातील सुंदरतेकडे वळावे अशी प्रत्येकाला संधी प्राप्त करून देणे हे राजकरणाचे खरे अंग मानावे. हेच आध्यात्मिक राजकरण.

या साऱ्या धडपडींचे पर्यवसान दीर्घ, सुखमय व सुंदर जीवन निर्माण होण्यात झाले पाहिजे. या शाश्वत ब्रह्म जीवनाच्या प्रवाहात ही सुंदर फुले फुलली पाहिजेत म्हणून प्रत्येकाने आपला वाटा उचलून हे जीवन जास्तीतजास्त सुंदर करण्याचा प्रयत्न करावा. सगळ्या बदलाकडे आणि सुधारणेकडे आध्यात्मिक दृष्टीकोण ठेवून त्या प्रवाहाशी जुळते राहावे. मानवी प्रगती, धडपड निसर्गावरील प्रभुत्व, सुधारणा, सांस्कृतिक जीवन यातून सर्वंकष आध्यात्मिकता दिसून आली पाहिजे. हीच सत्य, शिव, सुंदरतेकडे नेईल. स्वत:चे जीवन समृध्द करणे आणि भोवतालचे जीवन सुंदर करणे हीच आध्यात्मिकता, हीच मानव सेवा, हीच ईशपूजा, हेच अंतिम ज्ञान.

**जीवन-**

योग्य आचरणाचे भान होणे म्हणजे जीवन जगणे होय. यासाठी अवलंबिलेले मार्ग, तदर्थ केलेले सिंहावलोकन या साऱ्या या बाह्य जीवन प्रवाहात येतात. याची एकदा स्पष्ट जाण आल्यावर, आपले जीवन त्या जीवनाशी समरस कसे करता येईल. एवढेच मावाने पाहावयाचे असते. कारण मानव हा त्या जीवन प्रवाहातला

एक घटक आहे. त्या घटकाने आपल्या साऱ्या शक्तिनिशी या प्रवाहाशी योग्य वर्तन ठेवण्याचे आहे. मनुष्य कोणत्याही स्तरावर असो- लहान असो वा मोठा असो, गरीब वा श्रीमंत असो, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय जीवन जगत असो, तत्व ज्ञानी असो, भोगी वा योगी कोणी असो, हाच खऱ्या जीवनाचा अर्थ आहे. या जीवनाशी समरस होणे, आपली शक्ती संपूर्णतया या प्रवाहासाठी लावणे एवढेच प्रत्येकाचे काम आहे. यातून योग्य दिशेने जीवन घडेल. असे घडले असता जीवनाचा प्रवाह ब्रह्म प्रवाहापासून दूर जाणार नाही. हाच व्यावहारिक वेदान्त होय.

हा जीवन प्रवाह सूर्या सारखा सर्व अंध:काराचा नाश करणारा आहे. सारे तमोरूपी ढग विरून जातील आणि त्याबरोबर अंध:कार दूर होईल. मग स्वच्छ प्रकारचे जीवन पाहाता येईल. या ब्रह्म प्रवाहाशी एकरूप होणे हेच आनंदाशी एकरूप होणे होय. यातून स्वत:चे व आजूबाजूचे दु:ख, दैन्य, दारिद्य नाहीसे करण्याचे सामर्थ्य मानवाला प्राप्त होईल. त्यातूनच मानव वैश्विक शांती, सुख, समाधान अनुभवू शकतो.

शान्ति: पुष्टि: तुष्टि:च अस्तु ।

- शं.बा. मठ
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३ २०३०

## आनंद साधना

"मी तुमचें मूल आहे," "मला तुमच्याशिवाय कोणी नाही,"

हा भाव अखेर मला पसंत पडला. श्रीसद्गुरूंना लहानपणाची वृत्ति फार आवडते, म्हणून मी त्यांना "माऊली" मानू लागलो. वासनांनी आणि विकारांनी बरबटलेला मी मोठा हट्टी, रडका आणि अडाणी आहे; उलट श्रीसद्गुरूंचे अंत:करण इतके विशाल दयार्द्र आणि क्षमाशील आहे की माझ्यासारख्या अपंग पोरावर त्यांच्या मायेचे पांघरूण सदैव राहते. प्रापंचिक वासनांमध्ये मी पुन्हा पुन्हा बुडी मारतो, त्यातून बाहेर काढून पुन्हा पुन्हा प्रेमाने व अंत:करण न दुखवता मला स्वच्छ करणारी श्रीसद्गुरू माऊली धन्य होय. म्हणून मी त्यांचे लहान मूल झालो. माझ्या जीवनात श्रीसद्गुरू जें घडवून आणतील, जें मला देतील, जें माझ्यापासून नेतील, जें सुखदु:ख भोगायला लावतील, जें करण्याची संधी देतील, तें सगळे शंभर टक्के माझ्या कल्याणाचें असणार अशी माझ्या मनाची खरी भावना मी करून घेतली. म्हणून दु:खाचा प्रसंग आला तर एकदम दु:ख करायचें नाही आणि सुखाचा प्रसंग आला तर एकदम सुखी व्हायचें नाही, दोन्ही प्रसंगामध्ये जरा दम खायची म्हणजे शांत रहायची संवय कष्ट न करतां माझ्या मनाला लागली.

के. वि. बेलसरे यांच्या
पुस्तकातून

# भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना

*श्री. यशवंतराव साने यांच्या लेखमालिकेतील लेख क्र. ६ हा अनवधानाने द्यायचा राहिला होता. श्री. साने यांचे वैचारिक लेख एकत्रितपणे अभ्यासल्यास त्यातील सूत्र जाणवण्यासारखे आहे. पुढील अंकात लेखमालेतील नियमित लेख देण्यात येईल- संपादक*

### Cultural Revolution

दिशा मासिकाच्या मागच्या अंकात आपण दोन गोष्टींचा उल्लेख केला होता. अॅडाल्फ हिटलरचा 'नाझी सांस्कृतिक' असा जर्मनीतील/प्रयोग व माओत्सेतुंग याचा चीनमधील 'सांस्कृतिक क्रांती' (Cultural Revolution) असा 'मार्क्सिस्ट' तत्वज्ञानावर 'आधारलेला व प्रोलेटॅरिएट' क्लासच्या अंतिम सत्ता स्थापनेकरिता केलेला हा एक भीषण प्रयोग (१९६६-१९७६). याचे माध्यम 'संस्कृति' व जुन्या संस्कृतिचे उच्चाटन व नवीन संस्कृतिची स्थापना, हा ह्या दोन्ही ऐतिहासिक अमानुष प्रयोगांचा अंत होता. लाखो जर्मन, युरोपियन व विशेषत: ज्यू लोकांच्या हत्येत, दुसऱ्या महायुद्धात, व त्यानंतरच्या दूसऱ्या प्रयोगाचा इलायटिस्ट बुद्धीवादी वगैरे वर्गातील लाखो चीनी नागरिकांचे हत्याकांड यांत झाले. हे जगजाहीर आहे.

### मूलभूत आधार

पण त्यांतल्या राजकीय हेतू व विचारांपेक्षा आपल्या वेगळ्या पण सांस्कृतिक मूलभूत प्रश्नांचा विचार करावयाचा आहे. त्यानंतर मग 'भारतीय संस्कृति' ची पद्धत व वाटचाल ह्यांच्या गुणवतेची तुलना ह्याच मूलभूत मुद्यांच्या संदर्भात करावयाची आहे

### Issues

१) निखळ मानवी एकांगी 'निरीश्वरवादी' संकल्पनेवर आधारलेले हे दोन्ही प्रयोग अयशस्वी व भीषण का झाले?

२) ह्या दोन्ही प्रयोगांना कोणत्या भौतिकवादी तत्वज्ञानांचा व (world view) चा आधार होता? त्या वेळच्या 'वैज्ञानिक विचारांचा' ह्या प्रयोगांना कसा आधार होता? त्यावेळचे, मानवतावादी, विज्ञानवादी व बुध्दीवादी विचारवंत ह्या प्रयोगांना कसे आधार देत होते. चित्रकला, संगीत (Painting, Music Arts), फिल्मस् वगैरे कलेच्या क्षेत्रातली झालेली खळबळ, बदल उलथापालथ कोणती होती व ती कां झाली ?

३) ह्या भीषण, अपेशी, सांस्कृतिक बदलांचा मानवी संकल्पनेवर व निरीश्वरवादावर आधारलेल्या प्रयोगानंतर विचारवंतांनी व वैज्ञानिकांनी कोणते 'पक्षपाती' व 'पॅरॅडिमवादी' निष्कर्ष काढले ?

४) भारतीय संस्कृतीच्या चहात्यांनी कोणते निष्कर्ष काढावयाला हवेत ?

### जर्मन सांस्कृतिक प्रयोग


प्रथम आपण हिटलरच्या नाझी प्रयोगाची मांडणी करू या.

प्रथितयश व मान्यताप्राप्त जर्मन बायॉलॉजिस्ट वैज्ञानिक यांनी १९०० सालच्या सुमारास (Darwin) डार्विन यांच्या 'उत्क्रांतिवाद' 'Evolution' ह्या 'थिसीसला' उचलून धरले होते.

'Survival of the fittest' ''सशक्त जीवच फक्त जगण्याच्या योग्यतेच्या असतात'' ह्या डार्विनच्या

सिद्धांतांचा एक अर्थ, (मानवी) 'Superior Race' हीच जगण्याच्या लायकीची असते व हा **'निसर्ग नियम'** आहे असा लावण्यात आला. ह्या 'मानवी निसर्ग नियमांच्या शोधावर आधारून (Francis Galton) ह्याने 'Eugenics' 'युजेनिकस्' ही संकल्पना मांडली तिचा थोडक्यात अर्थ हा की ह्या नूतन संशोधनाच्या आधारावर मानवाचा जन्म व मृत्यू त्या घटनांबाबत निसर्गावर, अवलंबून न रहातां समाजात 'सुयोग्य' बदल करण्यात यावा. ह्यालाच **'Social Darwinism'** म्हणजे डार्विनच्या वैज्ञानिक संशोधनावर आधारून 'फंक्षीटीव्हिस्ट अॅप्रोच' समाजशास्त्रात घ्यावा हा अर्थ लावावा. हे नाझी राज्यकर्त्यांनी उचलून धरले. आतां 'श्रेष्ठ जात' कोणती हा प्रश्न सोडवणे आवश्यक होते.

ह्या प्रश्नाचा अपेक्षित निष्कर्ष 'जर्मन आर्यन' रेस ही 'सुपिरीयर' ठरवण्यांत झाला. हे सुद्धा 'शास्त्रीय पद्धतीने'!!. 'निसर्गावर हा निर्णय ठेवण्यांत कांही हंशील नाही, नाही कां ? तेव्हां खालील निष्कर्ष वाचा "The first step in an Eugenic Program was to determine which groups were genetically superior, a judgement that was heavily influenced by culture. The ideal traits were --- a human type whose appearance had been described by the 'race theorist' Hans F.K. Gunther Professor of 'Racial Science' university of Jena) as "blond, tall, long-skulled, with narrow faces, pronounced chins, narrow noses with a high bridge, soft hair, widely spaced pale-coloured eyes, pinky-white skin colour." (वि.स. खांडेकर व ना.सी. फडके यांच्या नायक-नायिका प्रधान कादंबऱ्यांची आठवण होते कां?)




चित्र नं. १

नाझी सत्ताधाऱ्यांनी आणखी कांही मुद्दे मांडले 'brain case sizes', 'Nordic Type' वगैरे त्यामुळे 'ज्यू' लोकांना बाद करण्यात आले.


Gunther stressed a person's geneological lineage, anthropological measurement of skulls and evaluations of physical appearance, were all used to determine their race. Even though physical appearance was stressed, "the body is the showplace of the 'soul' and the soul is primary."

मुद्दा हा आहे की डार्विनच्या उत्क्रांतिवादाचा मुख्य दुवा हा 'Selection' म्हणजे 'निवडीचे स्वातंत्र्य' हा करण्यात येऊन त्या थिअरीवर आधारुन जर्मन नाझी राज्यकर्त्यांनी 'Social Bio Policy' म्हणजे 'सामाजिक जैविक धोरण' आखले व स्पेशल टेक्नॉलॉजी निर्मीत हजारो ज्यू लोकांना 'गॅस चेंबर्स मध्ये Mass Scale वर मृत्यू देण्याचे कारखाने काढले. एव्हढेच नव्हे तर 'पॉझिटिव्ह साईडला' विधायक बाजूवर उत्कृष्ट जर्मन युवक व युवती यांच्या संबधातून पद्धतशीरपणे 'मास्टर रेस' ची नवीन पिढी निर्माण करण्याच्या 'मॅटर्निटी कारखानेही' काढले. अर्थात ह्या अर्धवट, पण 'वैज्ञानिक' सामाजिक प्रयोगातून उत्तम जर्मन बालके जन्माला यायच्या ऐवजी निकृष्ट प्रजा जन्माला झाल्याचे दिसल्यावर हे प्रयोग बंद पडले ही गोष्ट अलाहिदा!!

आणखी एक मुद्दा महत्वाचा आहे. धर्माच्या व ईश्वराच्या नांवावर इतिहासांत जे कांही गोंधळ, अन्याय, हालहाल, अत्याचार झाले त्याची चर्चा व रंवथ निरनिराळ्या माध्यमातून नेहमीच व अजुनही होतो. ह्याची आवश्यकता संमिश्र स्वरुपाची.

**विज्ञानाधिष्ठित संस्कृति**

पण, विज्ञानाचे चुकीचे निष्कर्ष व संहारक वैज्ञानिक संशोधनाची जाणूनबुजुन निर्मिती (Germs warefare, Star wars वगैरे) ह्यामुळे झालेल्या अत्याचारांबद्दल मूग गिळून बसण्यात विचारवंत धन्यता मानतात. मग ते अश्या वैज्ञानिक गैरकृत्यांना 'pseudoscience' म्हणून संबोधतात व स्वत:ला व वैज्ञानिक चुकांना व विज्ञानवादाला वाचवतात.



चित्र नं. २ Gas Chamber

**कॉ. डांगे, बा. नी. देशपांडे व वेदान्त**

ह्या संदर्भात 'भारतीय संस्कृतिचा' चेहरा पुष्कळच स्वच्छ आहे व अश्या वकिली पळवाटा शोधावयाला लागत नाहीत. उलट कॉ. डांगे यांचे जांवई श्री. बा. नी. देशपांडे यांनी "Universe of Vedanta" हे पुस्तक लिहीले व त्याला कॉ. डांगे यांनी प्रस्तावना लिहीली. त्यांत भारताने कुठल्याही देशावर आक्रमण केले नाही, ह्या मताला उचलून धरल्याने कॉ. डांगे यांच्यावर मार्क्सिस्ट कम्युनिस्ट पार्टीचे मुखपत्र जर्नलमध्ये आगपाखड करण्यात आली व 'शॉव्हिनिस्ट' Chauvinist अशी शेलकी शिवी हांसडण्यांत आली. मग त्यांनी स्टालिन, माओ व चीनचे आक्रमण यावर काय भूमिका घेतल्या ?

**Evolution Theory and Culture**

डार्विनच्या सिध्दांताचा एक अर्थ हा कीं निसर्ग हा नेहमी वरच्या श्रेणीच्या जीवाची 'निवड' Selection करतो. गृहीत ही कीं निसर्ग हे अदैवी निवड 'अहेतूक, निर्हेतुक' करतो. ह्या ऐवजी जर फ्रेडिक नित्शे (जर्मन तत्त्वचिंतक) ह्याच्या 'मास्टर थिअरी' वर आधारून ९/१० पिढ्यांचा 'स्वाहाकार' करुन समाज सुधारला तर खरी जीवांची उत्क्रांती होईल. एक मास्टररेस तयार होईल ह्याच तत्वाचा पुरस्कार फ्रान्सिस गाल्टन ह्या डार्विनच्या नातेवाईकाने युजेनिकस् (Eugenics) ह्या थियरीमध्ये केला. त्याबद्दल तत्कालिन विचारवंत काय म्हणत होते.

A Galton's suggestion that eugenics should functions as a religion was echoed by George Bernard Shaw, Bertrand Russel and others. A pungent assertion of the religious character of Eugenics comes from Julian Huxley, the first Director-General of the united Nations Educational Scientific, and Cultural Organisation (UNESCO) and a member of the Eugenics Society. "We must face the fact that now, in this year of grace, the great majority of human beings are substandard, they are undernourished, or ill, or condemmed to a ceasetess struggle for bare existence, they are imprisoned in a hell paved with unrealised opportunity. In this light the highest and most sacred duty of man is seen as the proper utilisation of the untapped resource of human beings." म्हणून त्याने "Evolutionary Humanism" ह्या नवीन धर्माची कांस धरली.

**भारतीय संस्कार पद्धती**

गर्भादान संस्कार, अध्ययन (उपनयन) संस्कार, विवाह संस्कार व शेवटी अंत्येष्टि संस्कार ह्यात काय आशय, गर्भित अर्थ आहे, कोणत्या गूढ पण प्रयोगशील पद्धति आहेत, त्यात वैश्विक अदृश्य, अव्यक्त शक्तिचा हातभार व ह्या शक्ति 'स्वसंवेद्य' असल्याने त्यांच्या ज्ञानाचा अनुकूल पद्धतिने कसा उपयोग करण्याचे योजिले आहे, इकडे लक्ष खेचण्याचे माझे प्रयत्न आहेत. हे प्रयत्न व संस्कार भारतातही लुप्त झाले आहेत व त्यांच्या पुनरूत्थापना करण्यासाठी निदान भारतातल्या जनतेने, राजसत्तेने, समाजसुधारकांनी, विचारवंतांनी आपली दृष्टि फिरवावी, ही इच्छा आहे.

हे थोडे मध्यंतरातले विषयांतर जाणीवपूर्वक केले की जेणेकरून **आपला उद्देश ह्या दोन-नाझी, चिनी फसलेल्या सामाजिक क्रांत्यांच्या चर्वीकरणाचा किंवा कांहीही राजकीय निष्कर्ष वा हेतूचा नसून त्यांतल्या महत्वाच्या 'बीज संकल्पनेतील' चुकांबद्दल आहे व तसा तो पाहिला जावा, हा उद्देश आहे.**

**चिनी प्रयोग**

आतां आपण थोडे चिनी प्रयोगांकडे वळू या. ईश्वर, सार्वभौम वैश्विक शक्ती, ब्रह्म, परमेश्वर, गॉड, देव, अल्ला, ॲडम, ईव्ह, खिस्त, सुप्रिम कॉशसनेस वगैरे वगैरे अनेक शब्दबद्ध संकल्पना मानवजातीने ह्या विश्वाच्या रचनाकर्त्याच्या संदर्भाने मांडल्या. ह्या विश्वाचे जे

faultless, regular, स्वसंवेद्य असे मॅनेजमेंट युगानेयुगे चालले आहे, ह्या विश्वातील वैचित्र्ये (Discovery Channel) पहा, ह्या विश्वातील नैसर्गिक संहार - त्सुनामी लाटा, भूकंप, ज्वालामुखी वगैरे वगैरे - तसेच ह्या जीवजीवाणूंचे परस्पर संबंध नाती वगैरे वगैरे पुरावे - अश्या अनेक संकल्पना मांडल्या आहेत, ह्या वरून वैश्विक नियंत्रकाच्या सामर्थ्याची कल्पना यावी.

### भैतिक विचारपद्धती

पण, त्या सर्वांना तुच्छ लेखून अश्या शक्तिच्या, सामर्थ्याच्या अस्तित्वाची काहीही खुण वा पुरावा उपलब्ध नाही व आवश्यक ही नाही, ह्या अहंकाराने 'बांधलेल्या' राजकीय नेत्यांचा सुकाळ मात्र जनमानसाला भारून टाकत आहे आणि स्वत:च्या अपूर्ण, तोकडया, विकृत, स्खलनशील बुद्धीवर', आधारलेल्या योजनामध्ये भरडून टाकत आहे.

### Political and Science

त्याचे उत्तम, ताजे, जवळचे उदाहरण म्हणजे चीनमधील सांस्कृतिक क्रांतिचे देण्यात येईल. काळ आहे १९६६ ते १९७६. ह्या सांस्कृतिक क्रांतीचा उद्देश काय होता ? Let us see what Roderick MacFarguhar writes :-

"To change the nature of the chinese people and to stave off the evils of Capitalism and revisionism by transforming the ideological realm, - education, literature, the Arts - and embracing Mao Tse-Tung Thought".




चित्र नं. ३

**संपूर्ण चिनी नागरिकाचा स्वभाव बदलायचाचा भांडवलशाही व सुधारणावाद यांतील दोषातून त्यांना वांचवायचे !!** कसे ? तर, त्यांच्या प्रचलित तत्वज्ञानावरील निष्ठा आमूलाग्र बदलून - शिक्षण, साहित्य, कला यांच्या मार्फत व माओ त्से तुंग ह्यांच्या 'विचाराला' (Thought) पूर्णपणे स्वीकारून !!"

म्हणजे, भारतातील अडाणी भाविक ज्या 'ईश्वरईच्छा' ह्या शब्दाचा वापर ज्या अर्थाने व श्रद्धेने करतात, तसा चिनी लोकांनी **ह्या प्रतिपरमेश्वर माओचा 'विचारांचा' स्वीकार करून** अणूरेणूमध्ये, नखापासून शिखापर्यंत स्वत:च्या शरीरात, मनात, बुद्धीमध्ये बदल घडवून आणायचा.

### शामभट व इंद्राचा ऐरावत

आपल्याकडे डॉ. मुरली मनोहर जोशी ह्यांनी जो तथाकथित सॅफ्रनायझेशन ('भगवीकरण') ह्याचा प्रयोग संशोधन, सरस्वती प्रार्थना व टेक्स्ट बुकस् (शालेय पुस्तके) बदलून करण्याचा 'घाट' घातला होता, तो या 'माओच्या' तुलनेने म्हणजे, कुठे ''शामभटाची तट्टाणी आणि कुठे इंद्राचा ऐरावत'' ह्या स्वरुपात मोडेल.

आणि म्हणूनच 'मेकॉलेची 'Imperial and Secular' शिक्षणपद्धती (Progressive) चालू रहाण्यासाठी - व ह्या नूतन सेक्यूलर भारतीय उद्दिष्टांसाठी व्यासांनी न कल्पिलेली महाभारतीय व्यक्ति **'अर्जुनसिंग'** ह्या नावाने अवतरित झाली.

"We were happily stared off from this evil attempt" नाही कां ? म्हणूनच डॉ. जोशी ह्यांच्या **'सरस्वतीचे वस्त्रहरण'** प्रख्यात जगप्रसिद्ध चित्रकार यांनी तत्परतेने केले. त्यांचे नाव **'एम. एफ. हुसेन नाही का ?** कलेचा केव्हढा हा सदुपयोग !!

भारतामधले आपल्या काळातले हे डॉ. मुरली मनोहर जोशी (भारतीय जनता पक्ष) व अर्जुनसिंग (सोनिया काँग्रेस) ह्यांच्या मधील 'सांस्कृतिक युद्धाचा' उल्लेख थोड्याश्या उपहासाने केला हे खरे !! हा मोह न आवरण्याचे कारण हे कीं **'समाजाचे संस्कृतीकरण' करण्याचे जे प्रयत्न भारतात नमून्यादाखल झाले, ते या जर्मनी व चीन यांच्या हिटलर व माओ, ह्यांच्या प्रयोगांची छोटीशी नक्कल होती. आपण पाहिलेल्या या 'भौतिकवादी मानवी एकांगी बुद्धीवर' आधारलेल्या प्रयोगांची नक्कल हे दर्शवते की संस्कार, मानवी संस्कृतीमूल्ये व निसर्गाची जीवनतत्त्वे व उद्देश यांच्याबद्दल भारतीय संस्कृतीमध्ये जे मूलभूत बीजात्मक ज्ञान आहे. त्याची सुतराम कल्पना नसलेले हे प्रयत्न व त्यांचा देखावी अविष्कार आहे. त्यांत फक्त राजकीय हेतू व लोकशाहीतील सत्तास्पर्धा दृष्टिपथात येते आहे.**

जर्मनीतील नाझी सांस्कृतिक क्रांतिचा हिटलरी प्रयोग हा डार्विन, फ्रान्सिस गाल्टन, युजेनिकस्, फ्रेडरिक नित्शे व 'मास्टर रेस थिअरी' यावर आधारलेला होता हे आपण पाहिले.

चीन मधील प्रयोग हा मार्क्सिझमच्या एका महत्वाच्या तत्त्वावर आधारलेला होता. काय होते ते गृहीत तत्व ?

"The standard Marxist Theoretical take on Culture 'that the transformation of the "Superstructure" must follow changes in the economic and political bases of Society."

ह्याचा सरळ अर्थ हा कीं ''संस्कृतीतील बदल किंवा क्रांति म्हणजे तिचे जे दृश्य व वरवरचे स्वरुप दिसते ते नेहमीच आर्थिक व राजकीय पायावर - त्यातल्या बदलांवर - आशयावर अवलंबून असते व ते तसे पायाभूत अधिकाराला अनुकूल बनते.

आतां हे आर्थिक व राजकीय बदल सोविएत रशियाच्या नमून्यावर चीनमध्येही माओत्सेतंग याने मोठ्या कर्तबगारीने घडवून आणले. पण रशियांत ह्या बदलानंतर जी 'कम्यूनिझम' या अंतिम ध्येयाकडे वाटचाल व्हावयाला हवी होती त्या ऐवजी ती परत भांडवलदारी पध्दतीनेच आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक बाबींमध्ये होताना दिसू लागली होती. यालाच 'रिव्हीजनिझम' ह्या लेबलने मार्क्सिस्ट परिभाषेत संबोधण्यात येते.

## Gang of Four

ह्या धोक्यापासून चीनला वाचवण्यासाठी माओने आपल्या पत्नीच्या (Madam Mao) जिंग किंग व सिक्यूरिटी प्रमुख चेन बोडा, कांग शेंग आणि वांग डाँगझिंग यांच्या नेतृत्वाखाली सांस्कृतिक क्रांतिचा भीषण प्रयोग चालू केला. काही टीकाकारांच्या मते मादाम जिअँग क्विंग हिने मात्र स्वत:च्या मताप्रमाणे हे तत्व उलटे करून वापरले. 'वर्गयुध्दाची वर्णने', प्रसंग, चित्रे, नाटके ही सांस्कृतिक देणगी चिनी जनतेला देऊन, कामगार-शेतकरी यांतील हिरोंचे आदर्श व जीवन चितारून चिनी जनतेच्या जनमानसांत व काँशसनेसमध्ये अपेक्षित असलेला बदल घडवून आणावयाचा, हा हेतू बाळगला होता.

पण, हे चित्र इतके निरागस, सरळ, सात्विक व प्रामाणिक बिलकूल नव्हते. वास्तवांत-सगळा Elitist वर्ग-बुध्दीवादी वर्ग, सांस्कृतिक परंपरा सांभाळणारा वर्ग, शिक्षक, प्रोफेसर्स, युनिव्हर्सिटीज् एव्हढेच काय कम्यूनिस्ट पार्टीतले कार्यकर्ते व नेतेही, या भयंकर संहाराला बळी पडले. 'रेड गार्डस' यांनी त्यांची विल्हेवाट लावली, मानहानी केली, त्याची वर्णने मूळातूनच वाचण्याच्या लायकीची आहेत. हा नरभक्षक संहार लाखो चिनी नागरिकांचा बळी घेण्यात झाला. व त्याचा शेवट फक्त माओचा मृत्यू १९७३ व **''गँग ऑफ फोर'' यांचे Purging 'पर्जींग' १९७६ मध्ये झाल्यावर ११व्या**

**पार्टी कॉंग्रेस ऑगस्ट १९७७ मधल्या सांस्कृतिक ठरावानंतर संपुष्टात आला.** जर्मनी व चीन ह्या दोन देशांतील आधुनिक निरीश्वरवादी राज्यकर्त्यांनी जो नवीन सांस्कृतिक मूलभूत प्रयोग आपल्या समाजावर केला, त्याचे सूत्र काय होते ?



"Gang of Four" Chinese Cartoon चित्र नं. ४

जगातील निरनिराळ्या वंशभेदात जर्मन आर्यन ही 'रेस' 'उच्च संस्कृतीचे' प्रतीक असल्याने - व ह्या निष्कर्षाला डार्विनच्या व गुंथर च्या विज्ञान संशोधनांचे पाठबळ असल्याने-निसर्गावर न अवलंबून रहाता-एका बाजूने आपल्या देशात व जगातही जे निकृष्ट रक्त व वंश आहेत त्यांना यमसदनास पाठविणे व त्यासाठी पूर्ण वैज्ञानिक अश्या गॅस चेंबर्स हा भाग यशस्वी करणे हा होता. **पण, थोड्याथोडक्या नव्हे तर १०० मिलीयन लोकांना ह्या, प्रयोगाचा तडाखा बसला.**

दूसरा भाग स्त्री पुरुष संबंध हे जूनाट संस्कृतीच्या विचारावर बांधले जातात, त्या ऐवजी 'अॅनिमल हजबंडरी' सारख्या वैज्ञानिक पद्धतीवर उत्तम स्त्री व उत्तम पुरुष हे 'जर्मन - आर्यन' ह्या श्रेष्ठ वंशाच्या पृथ्वीवरच्या अंतिम भविष्यातील एकमेव अस्तित्वासाठी - हे संबंध 'ऑरगनाईजड' आखीव व पद्धतशीरपणे योजण्यात यावेत. त्याचेही प्रयोग जोरात चालू झाले. निसर्गाचा दिसाळ व असंबंध व संथ पद्धतीवर ही ''मानवी विज्ञानाची मात'' होती नाही कां ?

ह्या उलट चीनमध्ये मात्र मार्क्सिझमच्या क्लास कॉन्फ्लिक्ट Class Conflict वर्गयुद्ध ह्या तत्वज्ञानावर आधारलेली कम्यूनिस्ट जीवन पद्धती अमलात आणण्यासाठी जरी राज्यकर्ते कटिबद्ध होते तरी त्यांना सोविएत रशिया हा पुन्हा भांडवलदारी जीवनपद्धतीकडे नकळत वा चोरून वळतांना दिसत होता. ह्यालाच 'रिव्हिजिनिझम' असे म्हणले जाते.

ह्या 'अपप्रवृत्तीवर' मात करण्यासाठी, भांडवलदारी समाजपद्धतीची जीवन मूल्ये - कष्टकरी व कामगार शेतकरी ह्यांच्या पिळवणूकीवर आधारलेली जीवनपद्धती, उखडून टाकणे आवश्यक होते. त्या कार्यक्रमात असे आढळून आले - (माओ त्से तंग ह्या विचारवंताला), कीं **ह्या अपप्रवृत्तीची मुळे बीजे ही एका प्रस्थापित व प्रचलित चीनी संस्कृतिमध्ये आहेत.** ही बीजे जमीनदारी व भांडवलदारी समाजपद्धतीच्या संस्कृतीची आहेत.

तेव्हां ''मूले कुठार'' : ''मूळावर घाव घातला कीं फांद्या खाली येतात - या न्यायाने ही जमीनदारी व भांडवलदारी संस्कृती काया-वाचा-मने चिनी नागरिकांच्या 'अस्तित्वातून' उखडून टाकली पाहिजे. मगच 'कम्यूनिस्ट सोसायटी' **Each according to his capacity to each according to his needs'** ह्या संस्कृतीकडे सुलभपणे वाटचाल करेल. प्रश्न हा पडेल कीं कदाचित हा प्रयोग ह्या पिढींत यशस्वी झाला तरी त्याचा उगम किंवा अध:पात पुन्हा 'भांडवलदारी संस्कृतीत परिवर्तित होणार नाही याची काय व्यवस्था ? हाही विचार ह्या 'सामाजिक क्रांतिच्या' अफाट प्रयोगांत अनुस्यूत होताच. त्यामुळे संस्कृतीची परंपरा पिढ्यानपिढ्या चालू ठेवणाऱ्या सगळ्या संस्था, पद्धती, विचार, तत्वज्ञान, खुणा, पेंटीग्ज, संगीत

वगैरे वगैरे, ह्यावरही हल्ले चढवून त्यांना नेस्तनाबूत करण्याचा हा कार्यक्रम १० वर्षे (१९६६-१९७६) राबवण्यांत आला.

दुर्दैवाची गोष्ट म्हणजे चीनी कम्यूनिस्ट पार्टीच्या पुढील नेत्यांनी माओच्या मृत्यूनंतर उघड, प्रच्छन्न पध्दतीने भांडवलदारी, चैनी, भोगवादी, चंगळवादी संस्कृतीची पुर्नस्थापना केली. एवढेच नव्हे तर **'शेअर बाजार' ह्या स्पेक्यूलेटिव्ह संपत्तीच्या मूल्यमापनाची व्यवस्थाही स्वागत करून स्थापली.** शिवाय, या **'धोबीपछाड' सोमर सॉल्ट (उलटी उडी)** चे ही विचार कम्यूनिस्ट तत्वज्ञानात कसे बसतात ह्याची 'वकीली' चालू केली.

**भांडवलदारी संस्कृति**

ह्या उलट, भांडवलदारी, प्रेसिडेन्शल डेमॉक्रसी व सेक्यूलर राज्यपद्धतीमधील अग्रणी देश जो अमेरिका - इथे मात्र असे प्रयोग होत नाहीत. जे काही मानवी बुध्दीला व्यावहारिक Pragmatic ल वाटतील ते करणे व होणाऱ्या सांस्कृतिक अवनतीला सामोरे जाणे व 'नैसर्गिक' म्हणणे, हा विचारच तिथे प्रबळ आहे. त्यामुळे अनेक सामाजिक प्रश्न जसे कुमारी माता, निग्रो माफिजा राज, शाळेमध्ये शिक्षकांचे विद्यार्थ्यांकडून खून, वगैरे वगैरे प्रश्न फारसे त्रासदायक मानले जात नाहीत. चर्चा जरून होतात पण क्रांतिकारी बदल आवश्यक वाटत नाहीत. त्यामुळे अमेरिकेच्या संस्कृतीला कम्यूनिस्ट विचारधारेचा 'Walkover' मिळाला आहे. उलट, भांडवलदारी संस्कृतिचा चेहरा मोहरा आमच्यामुळे बदलला आहे व आतां तो स्वीकारार्ह आहे अशी विचार धारणा कम्युनिस्ट विचारवंतांची आहे.

**निसंग, भारतीय संस्कृती**

आतां आपण आपल्या मूळ विषयाकडे वळू या. **भारतीय संस्कृतीची धारणा** ह्या तुलनेने काय आहे ? भौतिकवादी व आधुनिक विज्ञानवादी विचारधारानी पाश्चिमात्य संस्कृती भारावलेली आहे. भौतिक जगांत व ऐहिक जगात निसर्गनिर्मीत Elements वरती जी एकतऱ्हेची थोडेफार बदल करण्याची, सीमित नियंत्रणाची सत्ता विज्ञानाला प्राप्त झाली या विजयामुळे 'फ्रान्सिस बेकन व डेस्कार्त ह्या वैज्ञानिकांच्या अहंकाराची लागण समाजशास्त्रज्ञांनाही झाली. **पण, जसे भौतिक विज्ञान अजुनही 'भौतिक जगाच्या बाहेरील जगाबद्दल अनभिज्ञ आहे व म्हणून त्यांना विश्वाच्या व निसर्गाच्या संपूर्ण व्यवहार व नीतिमत्तेवर सत्ता मिळविता आलेली नाही तीच गत ह्या भौतिकवादी व निरीश्वरवादी समाजशास्त्रावर आली आहे.** हिटलर काय किंवा माओ त्से तुंग काय हे निसर्गाच्या सार्वभौम सत्ता व नीतिबद्दल अज्ञानीच राहिले आणि त्यांच्या एकांगी व विकृत बुध्दीमार्फत त्यांनी समाजरचनेमध्ये जे बदल घडवण्याचे भीषण प्रयत्न केले. त्यांत त्यांना अपयश तर आलेच पण भीषण मानवीसंहार झाला. **ह्याचे खरे मूल्यमापन राजकीय स्तरावर होणार नाही, तर ते निसर्ग किंवा ईश्वरी तत्व व त्यांची सत्ता व नीति ह्याच्या खऱ्याखुऱ्या जाणीवेत व आदरात असलेल्या मानवी ज्ञानाच्या स्तरावरच होऊ शकेल.**

**भारतीय संस्कृतीत ही जाण पूर्णपणे दिसून येते** आणि त्यामुळे ह्या निसर्गसत्तेला अनुलक्षून आखलेला **'संस्काराचा आराखडा'** काय आहे हे आपण पुढल्या लेखांत पहाणार आहोत. अर्थातच हा 'प्लॅन आज भारतीयांच्या जाणीवेत जिवंत नाही - सुप्तपणेच आहे - त्याचे पुनरुत्थापन करण्यासाठी हा अभ्यास आहे.

(क्रमशः)

**यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट, अग्यारी लेन, ठाणे - ४००६०१.
टे. नं. २५३६८४५०
E-mail : yrsane@eth.net Mbl : 9892046539

पुस्तक परिचय

# श्रीमद्भगवद्गीता

*स्वसुखाय केलेला गीतेचा ओवीमय अनुवाद असलेल्या नचिकेत प्रकाशनच्या पुस्तकाचा हा परिचय. - संपादक*

**ओवीमय अनुवाद**

अनुवादक - अनंत म. देशपांडे

नचिकेत प्रकाशन, मुंबई.

मूल्य - २० रु.   पृष्ठे - १०८

भगवत् गीतेवरचे चित्र मुखपृष्ठावर आहे. आडव्या पोथी सारखेच पुस्तक उघडावे. या पुस्तकाला कै. प.पू. पांडुरंगशास्त्री आठवले यांचा आशीर्वाद लाभला आहे. ''अनंतरावांनी आयुष्यभर कृतिशीलता आचरणात आणली त्यांच्या सारख्यांनी गीतेतील कृतिशीलतेवर लिहून तरुणांना मार्गदर्शन करावे.'' अशी अपेक्षा शास्त्रीजींनी त्यांच्याकडून केलीय. या पत्रावर ३ जून १९९७ ही तारीख आहे. बाकी कुठे पुस्तकाची आवृत्ती किती सालची आहे याचा उल्लेख नाही. डॉ. म. वि. गोविलकर यांचाही यात अभिप्राय दिला आहे, ते म्हणतात प्रत्येक अध्यायाचा गद्यात परिचय दिला आहे. हे अध्याय परिचय जरा विस्तृत केले तर त्याचेच पुस्तक तयार होऊ शकेल. लेखकाने तसा प्रयत्न करावा. वि. नि. वालावलकर, ज्येष्ठ विधिज्ञ, मुंबई उच्च न्यायालय यांचा तसेच के. भास्कर (भारतीय वनवासी कल्याण आश्रम) संघटन मंत्री यांच्याही अभिप्रायपर दोन ओळी आहेत.

मनोगतात लेखक म्हणतो चार वर्षापूर्वी झालेल्या कार अपघातामुळे वयाच्या सत्तराव्या वर्षी घरीच बसणे भाग पडले, त्यावेळी मला गीता व ज्ञानेश्वरीने आधार दिला. त्यावेळी हा मी स्वसुखाय अनुवाद केला होता.

लहानपणी संघ कार्यात बौद्धिक वर्गात काही गीतावचने ऐकली होती. ''कर्मण्येवाधिकारस्ते, ''यदा यदा ही धर्मस्य,' 'परधर्मो भयावह', वगैरे. १९४४ ला मॅट्रिक चांगल्या गुणांनी पास झालो. संस्कृतमध्ये ९८ टक्के मार्क्स मिळवले. त्यावेळी मा. बाबाराव भिडे मला म्हणाले एवढे संस्कृतात मार्क पडले तर गीता कधी वाचली आहेस का? मी नाही म्हटले. ते नाराजीने म्हणाले, पुन्हा कधी भेटशील तेव्हा स्थितप्रज्ञाची लक्षणे पाठ म्हणून दाखव. त्यांच्या बोलण्यामुळे मी पुढे स्पर्धेसाठी ३रा व १२वा हे दोन अध्याय पाठ केले पण न समजता, त्यामुळे गीतेचे संस्कार माझ्यावर झाले नाहीत.

पुढे १९५५-५६ ला लंडनला असताना रोज गीतेचे दहा श्लोक वाचत असे. हाच काय तो गीतेशी थोडा अधिक आलेला संबंध. १९५६ ला परतीच्या ८-९ दिवसांच्या बोटीच्या प्रवासात एक धक्का दायक घटना घडली. नेम म्हणून मी बोटीवर सुद्धा गीता वाचीत असे. बोटीवरील एक जर्मन गृहस्थ माझ्याजवळ आले. ते संस्कृत पंडित होते. मला गीता वाचतांना पाहून त्यांना माझ्याविषयी आदर वाटू लागला. मी त्यांना सांगितले की मी तसा संस्कृत पंडित नाही, तरी त्यांनी माझ्याकडून स्थितप्रज्ञाची लक्षणे म्हणून घेतली. माझे स्पष्ट उच्चार व खणखणीत आवाज ऐकून ते जर्मन संस्कृत पंडित माझ्यावर खूष झाले आणि दुसऱ्या दिवसापासून दररोज तीन चार अध्याय म्हणायचे ठरले. मी मनातून धास्तावलो. संपूर्ण गीता म्हणण्याचे हे धाडस! मी प्रथमच करणार होतो. ही माझी परीक्षाच होती. मी आदल्या दिवशी ते अध्याय दोन दोन वेळा म्हणत असे व दुसऱ्या दिवशी त्या पंडिताकडून म्हणवून घेत असे. ते माझे तोंड भरून कौतुक करीत असत. आणि एक दिवस

मुंबई बंदराचे दिवे दिसू लागले व माझी त्याच्या तावडीतून सुटका होणार, आपली 'झाकली मूठ सव्वा लाखाची' राहणार याचा मला आनंद झाला. पुढे काही वर्षे त्यांच्याशी पत्र व्यवहार होत होता.

मी हिंदु, संघ कार्यकर्ता असून सगळी गीता मला अर्थासह माहीत नव्हती याचे वाईट वाटले. म्हणून जेव्हा मला घरी बसावे लागले त्यावेळी मी सहज प्रयत्न केला व स्थितप्रज्ञाची लक्षणे ओवीबद्ध केली ती अगदी एकाच दिवसात. मग मला ते वेडच लागले व मी दीड दोन महिन्यात संपूर्ण गीता ओवीबद्ध केली. मग वाटले कोणाला तरी दाखवावी म्हणून १९६६ साली माझ्याबरोबर तुरुंगात असलेले पुण्याचे डॉ. वासुदेवराव परांजपे यांना ती दाखवली. कारण रोज तुरुंगात गीता वाचताना मी त्यांना पाहिले होते. तसेच गीता व ज्ञानेश्वरीचे प्रवचनकार नाशिक विभागाचे माजी संघ चालक श्री. भाऊसाहेब गोविलकर यांना ही माझ्या वह्या दाखवल्या. त्यांनी त्या ओव्या म्हणून पहा म्हटले मग मी माझ्याच आवाजात चालीवर त्या ओव्या म्हणून टेपरेकॉर्ड केल्या, घरच्यांना ऐकवल्या. मग एवढ्यावरच थांबले.

मनात वाटत होते संस्कृत गीता कोणाला कळत नाही तर हा अनुवाद सर्वांपर्यंत पोचावा. पण मनात म्हटले असे गीतेवर अनेकांचे अनुवाद आहेत. विनोबांची 'गीताई' आहे. कोण वाचतोय हे सर्व ! आता आपल्या वह्यांचे लोणचे घालावे लागणार ! पण एक दिवस महाराष्ट्राचे अशा वेड्या उद्योगांना उत्तेजन देणारे मा. मोरोपंत पिंगळे घरी आले. तुझ्या गीतेचे काय झाले ? प्रसिद्ध करणार ना ? म्हणाले. मी कोण करणार प्रसिद्ध ! विचारले तर म्हणाले तू स्वतःच कर. पण वह्या तशाच कुजत ठेऊ नकोस. म्हणून मग मीच 'नचिकेत प्रकाशन' नावाने पुस्तक प्रसिद्ध केले.

ज्या घरी गीता वाचन । त्या घरी कर्तव्याची जाण ।
शांती धीरता समाधान । आणि आनंद वसत राही ॥

भगवत् गीतेचा इतिहास सांगून नंतर प्रथमाध्यायाला सुरूवात झाली आहे ती अध्यायाच्या सारांशाने नंतर ओवीमय अनुवाद, संस्कृत श्लोका समोर त्याचा अनुवाद आहे. ही सुरवात बघा -

धृतराष्ट्र उवाच - धर्मक्षेत्र कुरुक्षेत्रे ...

धृतराष्ट्र म्हणाला -

पुण्यदायी कुरुक्षेत्री जमलेले ।
युद्धभूमीवर युद्धासाठी आलेले ।
मम पुत्र नि पांडव सामोरे ठाकलेले ।
काय केले त्यांनी संजया ॥१॥

पांडवांनी व्यूह रचिलेला । दुर्योधनाने तो पाहिला ।
मग द्रोणाजवळी तो गेला । आणि म्हणाला ते असे ॥२॥

आचार्य पहा या महासेनेला ।
पांडवांच्या तसेच त्यांच्या व्यूहाला ।
धृष्टद्युम्नानेच रचिलेल्या ।
जो असे तुमचा शूर शिष्य ॥३॥

**अध्याय दुसरा** - श्री भगवान उवाच, "अशोच्यानन्वशोचस्त्वं.. ॥११॥

श्री भगवान म्हणाले -

करू नये ज्याचा शोक । सोडुनि मनिचा सर्व विवेक ।
त्याचाच तू करिशी शोक । पंडित समजुनी बोलसी ॥
विद्वान कधीही दुःख न करिती। सुखदुःखाते एक मानिती ।
मेले जगल्यांचे शोक न करिती । शांत रहाती सर्व समयी ॥११॥

सुख दुःखे समे कृत्वा ... हा श्लोक पहा -
सुखदुःख लाभ हानी । जय पराजय सम समजोनी ।
युद्धास तयार होऊनी । पाप न लागे तुज काही ॥३८॥

**अध्याय ४ था** - यातील हे दोन श्लोक बघा -

किम् कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिता: ।
तत्ते कर्म प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वा मोक्ष्यसे शुभात् ॥१६॥

कर्म कोणते ? अकर्म कोणते ? मोहित झाले अनेक ज्ञाते ।
सांगिन तुज मी त्या कर्माते । समजुनी ती होशील मुक्त तूं॥१६॥

कर्मनो ह्यपि बोधव्यं बोधव्यं च विकर्मण:।
अकर्मणश्च बोधव्यं गहना कर्मणो गति: ॥१७॥

कर्म विकर्म हे समजूनी घ्यावे। अकर्म हेही तू जाणावे ।
कठीण कळणे कर्मतत्त्व हे। त्या तत्त्वाला तू समजावे ॥१७॥

**अध्याय ९ वा** - ३२,३३,३४ या श्लोकांचे अनुवाद पहा -

केवळ माझा आश्रय घेऊन। स्त्री वैश्य वा शूद्र असून ।
नीच कुळात वा जन्म घेऊन । जाती परमगतीला ते पार्था ॥३२॥

राजर्षि वा ब्राह्मण पुण्यवान। मम भक्ता मिळे सद्गती जाण।
अनित्य दु:खलोकी घेतला जन्म। म्हणूनी भजन कर माझेच ॥३३॥

माझ्या ठायी ठेवी मन। भक्त होऊन कर मज नमन।
आत्मयुक्त नि मत्परायण। होऊन मलाच मिळशील ॥३४॥

**अध्याय १५वा** - पहिलाच श्लोक पहा, श्री भगवानुवाच -

उर्ध्वमूलमध: शाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् ।
छंदांसि यस्य पर्णानि यस्तं वेद सवेदवित् ॥१॥

ज्याचे मूळ असे वरती। शाखा ज्याच्या असती खालती ।
जो न पावे नाश कधी । वेद ज्याची पालवी असे ।

अनादी सनातन जो आहे । अश्वत्थ नाव ज्याचे आहे।
जाणतो रुप ह्याचे हे। तोच वेदा जाणितो ॥१॥

अधश्चोर्ध्वं प्रसृतास्तस्य शाखा
गुणप्रवृद्धा विषयप्रवाला:।
अधश्च मूलान्यनुसन्ततानि
कर्मानुबन्धानि मनुष्यलोके ॥२॥

खाली वरती फांद्या असलेला ।
सत्व, रज, तम यांनी वाढलेला।
विषयाची पाने फुटलेला।
कर्मविपाकाची मुळे असलेला ।
मनुष्य लोकी मुळे पसरलेला।
अश्वत्थ वृक्ष मीच असे ॥२॥

यावरुन वाचकांना गीतेच्या अनुवादाची कल्पना येईल. **अत्यंत सोप्या, साध्या समर्पक योजनेमुळे सामान्य माणसालाही गीतार्थाचे आकलन सहज होऊ शकेल.** मलपृष्ठावर शंखनाद करणाऱ्या श्रीकृष्णाचे चित्र आहे. खाली सुंदर वचन लिहिले आहे. ''क्षुद्रं हृदय दौबल्यं'' कुठेही गीतेवरचे पुस्तक आढळले की त्याचे अंतरंग वाचकापुढे उलगडून दाखवण्याचा मोह मला पडतो. मग ते पुस्तक मोठे असो वा छोटे किंवा लेखक प्रख्यात असो वा नसो. त्याची गीतेविषयीची भक्ती व स्फूर्ती महत्त्वाची. त्याशिवाय कोणीही गीतेला हातच घालू शकणार नाही. ज्ञानोबापासून विनोबापर्यंतच काय त्यापुढेही गीतेवर बरेच लिखाण झाले आहे व पुढे ही होत राहणार आहे. 'गीता' हा अजरामर ग्रंथ आहेच तसा विश्वाला मोहिनी घालणारा, कर्ममार्गे मोक्षास नेणारा.

**आशा भिडे**
बी/९ विजय अपार्टमेंटस्
आराधना टॉकीजजवळ
ठाणे (प) ४०० ६०२
दूरध्वनी - २५४१०१४०

# दुर्मिळ पुस्तकांच्या जगात

*दुर्मिळ पुस्तके म्हणजे काय, दुर्मिळ पुस्तके दुर्मिळ केव्हा आणि कशी होतात, हा ग्रंथ शास्त्रातील अभ्यासाचा विषय आहे. एस्. एन्. डी. टी. महिला विद्यापीठाच्या ग्रंथपाल सौ. सुषमा पौडवाल यांनी या प्रश्नांच्या उत्तरांच्या दिशेने घेतलेला वेध - संपादक*

पुस्तकनिर्मितीचा इतिहास अत्यंत मनोरंजक आहे. दुर्मिळ पुस्तकांचे या इतिहासाशी अतूट नाते आहे. आपल्या भावभावना, विचार व्यक्त करण्याची, इतरांपुढे मांडण्याची व कायम स्वरुपात नमूद करुन ठेवण्याची ऊर्मी माणसामध्ये फार पूर्वीपासून दिसते. दगड, पाने, विटा, धातू, कापड अशा विविध माध्यमांचा त्याने यासाठी उपयोग केला. वेगवेगळ्या माध्यमांच्या शोधात माणूस अधिक टिकाऊ व सोयिस्कर साधने शोधून कागदापर्यंत आला असावा. आज आपण ज्या कागदावर छापून एकत्रित बांधणी केलेल्या वस्तूला 'पुस्तक' म्हणतो ते पुस्तक मानवाला मुद्रणकलेचा शोध लागल्या नंतरचे आहे. त्या आधीचे 'ग्रंथ' हस्तलिखित स्वरुपात होते.

१५ व्या शतकाच्या मध्यावर मुद्रणकलेचा शोध लागला. सुरुवतीच्या काळातली म्हणजे इसवी सन १५०० पर्यंतची पुस्तके 'दोलामुद्रिते' 'पाळण्यातील पुस्तकबाळे' ऊर्फ Incunabula होत. लॅटिनमध्ये Cunae म्हणजे पाळणा व Incunabula हे Incunabulum चे अनेकवचन. कालौघामध्ये हस्तलिखिते, दोलामुद्रिते दुर्मिळ होऊ लागली. त्यांचे संग्रह, जतन व उपलब्धी तसेच मूल्यनिश्चिती या गोष्टी महत्त्वाच्या असूनही बरेचदा दुर्लक्षित राहिल्या आहेत.

'दुर्मिळ' पुस्तके कोणती? आज विक्रीस उपलब्ध नसलेली सर्वच पुस्तके दुर्मिळ म्हणता येतील का ? दुर्मिळ ग्रंथांचे ग्रंथालयातील स्थान कोणते? असे अनेक प्रश्न दुर्मिळ पुस्तकांचा विचार करीत असताना पडतात. आज बाजारात विकत न मिळणारा ग्रंथ बऱ्याच ग्रंथालयात किंवा व्यक्तींच्या संग्रहात असण्याची शक्यता असते. त्यामुळे केवळ मुद्रणातील वा विकत न मिळणाऱ्या पुस्तकाला दुर्मिळ म्हणता येणार नाही. 'पुस्तक वेडावर पुस्तक लिहिणारा हॉलब्रुक जॅकसन म्हणतो, " काही पुस्तके जन्मत:च दुर्मिळ असतात; काही जन्मानंतर दुर्मिळ होतात तर काहींवर दुर्मिळत्व लादले जाते!"

अ. का. प्रियोळकरांनी 'काळ' व पुस्तकाची 'जगातील उपलब्धता' हे दोन महत्वाचे निकष पुस्तकांचे दुर्मिळत्व ठरविण्यासाठी वापरले आहेत. फादर स्टिफन्सच्या ख्रिस्तपुराणासारखा ग्रंथ मुद्रित झाल्याचा उल्लेख सापडतो. पण त्या ग्रंथाचा थांग लागणे कठीण आहे. यासारखे ग्रंथ निर्विवादपणे दुर्मिळ म्हणावे लागतील. ज्या मराठी ग्रंथाची एकच प्रत ज्ञात आहे. त्यांना प्रियोळकरांनी 'अनन्य' म्हणूनच दुर्मिळ म्हटले आहे. ज्या पुस्तकाच्या जगात दहापर्यंत प्रती असतील असे ग्रंथ त्यांनी 'अत्यंत दुर्मिळ' म्हटले आहेत. आणि ज्या ग्रंथाच्या जगात पन्नास-साठच प्रती असतील त्यांना 'फार दुर्मिळ' असे संबोधले आहे.

पुस्तके दुर्मिळ असणे हे सापेक्ष असते. प्रसिद्धी कालानुसार दुर्मिळ पुस्तकांचा विचार करायचा झाला तर हस्तलिखिते, दोलामुद्रिते, पुस्तकांच्या पहिल्या प्रती इत्यादींचा विचार आवश्यक ठरतो. मुद्रणाच्या पहिल्या कालखंडात काढलेल्या प्रती अत्यंत मर्यादित असत त्यामुळे कालांतराने ती पुस्तके दुर्मिळ होतात. अशा पुस्तकांच्या नंतर आवश्यकतेनुसार मुबलक प्रती काढल्या गेल्या तर ती

पुस्तके दुर्मिळ राहणार नाहीत. कित्येकदा आशयामुळे पुस्तकावर बंदी घातली जाते. पुस्तक दुर्मिळ होतं. पुस्तकांची बांधणी, विशिष्ट रचना वा स्वरुपही त्याच्या दुर्मिळतेला कारणीभूत ठरु शकते. रचनेचे वा वैचित्र्य असलेल्या पुस्तकांच्या मर्यादित प्रती काढल्या जातात. अशी पुस्तके सहज बाजारात मिळत नाहीत. म्हणजेच काळ, उपलब्धता, आशय आणि निर्मितीचे वैचित्र्य अशा विविध कारणांमुळे पुस्तक दुर्मिळ ठरू शकतं.

**कालौघात दुर्मिळ ठरलेली पुस्तके -**

**१) हस्तलिखित -**

हाताने लिहिलेली ती हस्तलिखिते. मुद्रण पूर्वकालीन आणि मुद्रणोत्तर अशी दोन प्रकारची हस्तलिखिते आढळतात. मुद्रणपूर्वकालीन हस्तलिखितांच्या मुद्रित प्रती आढळणे कठीण आहे. हस्तलिखितांतही मूळ ग्रंथकाराच्या हातचे हस्तलिखित अधिक महत्त्वाचे ठरेल. ग्रंथकाराने सांगतिलेल्या ग्रंथाचे लेखनिकाने लिहून काढलेले हस्तलिखितही 'हस्तलिखित' असले तरी आधी उल्लेखिलेल्या ग्रंथकाराच्या हस्तलिखिताएवढे ते मौलिक ठरणार नाही. भारतातील ज्ञानप्रसाराच्या मौखिक परंपरेमुळे भारतीय हस्तलिखिते आणि हस्तलिखिते पोथ्यांची आज दुर्मिळ साहित्यात गणना करावयास हवी. मुद्रण कलेच्या आगमनानंतरही प्रसिद्ध लेखकांच्या ग्रंथांचे मूळ हस्तलिखित महत्त्वाचे आहे. सावरकरांच्या हस्ताक्षरातील 'कमला' काव्य ग्रंथसंग्राहकाला व संशोधकांना निश्चितच मोहात पाडील. (ते त्यांनी तुरुंगातील आपल्या बरोबरच्या कैद्याला मुखोद्गत करायला लावले होते.) मुळात लेखाकाला वा कवीला काय म्हणायचे होते व त्यानंतर त्या साहित्यावर कसकसे लेखनसंस्कार व परिष्करणे होत गेली यांचा हस्तलिखितांद्वारा शोध घेणे संशोधकांना सोयीचे होते. केशवसुतांच्या कवितांची हस्तलिखिते अशीच कवितेच्या संस्करणांचा मागोवा घेण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरलेली आहेत. ही हस्तलिखिते लेखकांच्या साहित्यनिर्मितीचा उत्तम दस्तैवज म्हणून जपणे आवश्यक आहे. या संदर्भात रमेश तेंडुलकर संपादित 'वा. लं. च्या डायऱ्यांतील टिपणे' या पुस्तकाचे उदाहरण उचित ठरेल. ही टिपणे वा. ल. च्या नोंदी, दुरुस्त्या यांसकट यथामूल प्रसिद्ध झाली असली तरी प्रत्यक्ष डायऱ्यांचे मूल्य पुस्तकापेक्षा अधिक ठरेल. हस्तलिखिते आणि छापील प्रती यांमध्येही असा फरक करणे आवश्यक ठरते.

तंजावरचे सरस्वती महाल ग्रंथालय, धुळे येथील 'श्री समर्थ वाग्देवतामंदिर' केरळ विद्यापीठ ग्रंथालय एशियाटिक ग्रंथालय, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई विद्यापीठ ग्रंथालय, जयकर ग्रंथालय पुणे अशा अनेक ग्रंथालयांतून मराठी हस्तलिखिते संग्रहित केलेली आहेत. एशियाटिक ग्रंथालयाकडे पुलंची काही हस्तलिखित नाटके सध्या उपलब्ध आहेत असे समजते. राज्य मराठी विकास संस्थेने गेल्या काही वर्षांत त्रिवेंद्रम, तंजावर, मद्रास, कर्नाटक व हैद्राबाद येथील विविध ग्रंथालयांतील हस्तलिखितांच्या सूची प्रसिद्ध केल्या आहेत. मुंबई विद्यापीठातील कवी मोरोपंतांच्या संग्रहातील हस्तलिखितांची डॉ. उषा भिसे यांनी संपादिलेली सूचीही प्रसिद्ध झाली आहे. या सूची हस्तलिखितांच्या दुर्मिळ अक्षरधनाच्या वाटाड्या म्हणून अत्यंत उपयुक्त ठरणाऱ्या आहेत.

१९८० मध्ये महाराष्ट्र शासनाने ग्रंथालय संचालनालयात स्वतंत्र हस्तलिखित विभागाची स्थापना करून हस्तलिखित सल्लागार समिती नेमली आहे. संचालनालयाकडे आलेल्या दुर्मिळ ग्रंथांची तपासणी, निवड व मूल्यनिश्चिती करणे हे या समितीचे उद्दिष्ट आहे.

**२. दोलामुद्रिते -**

दोलामुद्रिते हा ग्रंथसंग्रहातील अमूल्य ठेवा आहे. मराठी पुस्तकांच्या मुद्रणाचा जन्मकाल म्हणजे १९ व्या शतकाची सुरुवात. अ. का. प्रियोळकरांनी मराठी

दोलमुद्रितांचा काळ १९०० पर्यंतचा ठरविला आहे. इंग्रजीतील १५०० पर्यंतचे ग्रंथ म्हणजे दोलामुद्रिते १५ व्या शतकात प्रत्येक पुस्तकाच्या २५०-३०० पर्यंत प्रती छापत असत. त्यातली कित्येक आज कालौघात गडप झालेली आहेत. या दृष्टीने या पुस्तकांचे मोल वादातीत आहे. एशियाटिक ग्रंथालय, विद्यापीठीय ग्रंथालये, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, हेरास इन्स्टिट्यूटचे ग्रंथालय, नॅशनल लायब्ररी, कलकत्ता, भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्थेचे ग्रंथालय पुणे, प्राच्य विद्या संशोधन संस्थेचे ग्रंथालय ठाणे अशा कित्येक ग्रंथालयात दोलामुद्रितांचा संग्रह उपलब्ध आहे. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयातील अ. का. प्रियोळकर, सु. आ. गावस्कर व गं.ना. मोरजे यांच्या दोलामुद्रितांच्या सूची जयकर ग्रंथालयातील दोलामुद्रितांच्या सूची, जयकर ग्रंथालयातील दोलामुद्रितांची शां. ग. महाजन यांची सूची पाहिल्यास या संग्रहाची कल्पना येईल. मुंबई विद्यापीठाने १९६७ मध्ये आपल्याकडील तसेच मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय व हेरास इन्स्टिट्यूटमधील १८६७ पूर्वी मुद्रित झालेल्या ग्रंथांचे प्रदर्शन भरविले होते. या प्रदर्शनात ठेवलेल्या पुस्तकांची सूचीही विद्यापीठाने प्रसिद्ध केली आहे.

**३.पहिल्या प्रती :-**

मुद्रणप्रसारानंतर अनेक लोकप्रिय ग्रंथांच्या नव्या आवृत्त्या निघू लागल्या. अशा वेळी जुन्या व पहिल्या आवृत्त्या दुर्मिळ होणे साहजिक आहे. या पहिल्या दुर्मिळ प्रतींना आज कमालीचे महत्त्व व मूल्य आहे. मोल्सवर्थच्या मराठी-इंग्रजी कोशाची १८३१ सालची आवृत्ती, मोनियर विल्यम्सच्या संस्कृत-इंग्रजी कोशाची १८७२ सालची पहिली आवृत्ती या दुर्मिळ आणि पहिल्या म्हणूनच संग्राह्य आहेत. नंतरच्या आवृत्त्या उपयुक्ततेच्या दृष्टीने अधिक वरचढ असल्या तरी दुर्मिळतेच्या मूल्यानिकषावर घासल्यास या पहिल्या आवृत्त्यांना सोन्याचे मोल आहे असे म्हणावे लागेल. पहिल्या आवृत्तीची मूल्यनिश्चिती करीत असता त्या पुस्तकाच्या निर्मितीचा इतिहास लक्षात घेणे आवश्यक ठरते. पहिल्या प्रतीची प्रस्तावना, अर्पणपत्रिका, छपाई इत्यादी गोष्टींचे निरिक्षण, बारकाईने केलेले वाचन, जुन्या पुस्तकांच्या बाजारातील व दुकानांतून फेरफटका, ग्रंथालयांच्या तालिका व उपलब्ध सूचींचे अवलोकन, याबाबतीत तारतम्य व अचूक अंदाज यासाठी आवश्यक ठरतात. पुस्तकांच्या जगात वावरणाऱ्याला अनुभवानंतरच संग्रह शहाणपण (की वेडेपण?) कळू लागत असावे. ग्रंथविषयक माहितीसाठी शं. ग. दाते यांच्या 'मराठी ग्रंथसूची' ला साधनग्रंथ म्हणून आजही मराठीत तोड नाही.

कालमहिम्यामुळे पुस्तके जशी दुर्मिळ होतात, तशीच अनेकदा कमी प्रती निघाल्याने तर काही वेळा नैसर्गिक आपत्तींमुळेही पुस्तके दुर्मिळ होतात. कित्येक वेळा पुस्तक छापून झाल्यावर त्यावर बहिष्कार घातला जातो. किंवा पुस्तकातील काही पृष्ठे रद्द करावयास लागतात. अशा तऱ्हेने पुस्तकांच्या पुढील प्रती काढण्यास प्रकाशक धजत नाहीत. किंवा तो मजकूर गाळला जातो. अशी पुस्तके दुर्मिळ होण्याची दाट शक्यता असते. उदाहरणार्थ-य.दि.फडके संपादित दिनकरराव जवळकर समग्र वाङ्मय आज उपलब्ध आहे. या पुस्तकातील 'देशाचे दुष्मन' या जवळकरांच्या पुस्तिकेवर पुस्तकाच्या प्रकाशनानंतर सहा वर्षांनी म्हणजे १९९० साली पंढरपूरच्या 'प्रहार' पत्रातर्फे जोरदार आक्षेप घेतला गेला व संपादकांवर खटला टाकला जावा अशी मागणी केली गेली. अशा घटनांमुळे यासारख्या वादग्रस्त पुस्तकांच्या पुढच्या आवृत्त्या जशाच्या तशा निघणे अवघड ठरत असते. कित्येकदा आक्षेप घेतलेला मजकूर गाळून पुढच्या आवृत्त्या निघतात. एवढेच नव्हे तर या पुस्तकाची प्रतही जाळली गेली.

आता 'उपलब्धी' च्या दृष्टिकोनातून दुर्मिळ पुस्तकांचा विचार करू. यात कोर्टप्रविष्ट पुस्तके, बंदी घातलेली पुस्तके, स्वाक्षरी पुस्तके, वैचित्र्यामुळे आगळी-वेगळी ठरलेली पुस्तके या प्रकारांचा विचार करावा लागेल.

**१) न्यायालय प्रविष्ट पुस्तके -**

वादग्रस्त आणि कोर्टप्रविष्ट पुस्तके लवकरच दुर्मिळ होतात. बी.सी.मर्ढेकरांचा 'काही कविता' हा अश्लीलतेवरील खटल्यामुळे गाजलेला संग्रह, काकोडकरांची अश्लीलतेच्या खटल्यामुळे कोर्टप्रविष्ट झालेली 'शामा' कादंबरी या प्रकारात मोडतील. अशा वेळी कालांतराने ही पुस्तके उपलब्ध झाली तरी या संदर्भातील खटल्याचे कागदपत्र, कोर्टाने दिलेला निकाल हे साहित्यही संग्रहाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते.

**२) बंदी घातलेली पुस्तके -**

काही पुस्तकांवर विशिष्ट कालखंडात त्यांमधील आशयामुळे बंदी येते. अशी पुस्तकेही कित्येकदा दुर्मिळ होतात. सावरकरांचे 'जोसेफ मॅझिनी' हे बराच काळ जप्त असलेले पुस्तक आज दुर्मिळ नसले तरी संशोधकांना महत्त्वाचे आहे. या पुस्तकाच्या नंतरच्या आवृत्तीच्या अर्पणपत्रिकेत काटछाट केलेली आढळते. हा ग्रंथ लोकमान्य टिळकांना व 'संदेश' कार अ. ब. कोल्हटकरांना अर्पण केला आहे. पहिल्या आवृत्तीच्या अर्पणपत्रिकेतील टिळकांना व कोल्हटकरांना लावलेली भावोत्कट विशेषणे पुढच्या आवृत्तीत गाळली आहेत.

'माहीमची खाडी' 'वासूनाका' यासारखी वादग्रस्त ठरलेली पुस्तकेही आज दुर्मिळ व वैशिष्ट्यपूर्ण ठरण्याची शक्यता संग्राहकांनी जरूर लक्षात घ्यायला हवी.

**३) स्वाक्षरी पुस्तके -**

'पुष्पासंगे मातीस वास लागे' या उक्तीनुसार लेखकाच्या संग्रहातील त्यांच्या स्वाक्षरीची किंवा त्यांनी सही करून भेट दिलेली पुस्तके संग्राहक तसेच संशोधकांच्या दृष्टीने अमूल्य म्हणावी लागतील. कित्येकदा एकाच ग्रंथावर लेखकाची तसेच नंतर ज्यांनी ते पुस्तक घेतले त्या सर्वांच्या सह्या वा शेरेवजा नोंदी असतात. हे पुस्तक अनेकदा वेगळेगळ्या लेखकांकडून व लेखक-वाचकांकडून वापरले जाते. त्यामुळे ते पुस्तक स्वतः एक वेगळा इतिहास सांगणारे ठरते. अशा गमतीदार पुस्तकेतिहासाला तज्ज्ञांनी Pedigree किंवा वंशपरंपरेचा वारसा सांगणारी पुस्तके म्हटले आहे. अ. का. प्रियोळकर, सं. ग. मालशे यांनी आपल्या संग्रहातील अशा पुस्तकांची माहिती आपल्या लिखाणातून दिली आहे. ही पुस्तके वाचत असता समासातील नोंदी, शेरे व ताशेरे, खुणा यांतून वाचकाला मिळणारी माहिती, आनंद नि समाधान त्याला वेगळ्याच जगात नेणारे आहे. अ. का. प्रियोळकरांचा ग्रंथसंग्रह मुंबई विद्यापीठ ग्रंथालयात उपलब्ध असून मालशे यांची निवडक पुस्तके श्री. ना. दा. ठा. विद्यापीठ ग्रंथालयात डॉ. सं.गं. मालशे केंद्रात संदर्भासाठी उपलब्ध आहेत. प्रियोळकर संग्रहप्रमाणेच लोकहितवादी, द.ग.गोडसे, श्री. रा. टिकेकर यांच्या संग्रहातील पुस्तकेही मुंबई विद्यापीठ ग्रंथालयात उपलब्ध आहेत. गं. दे. खानोलकर, शा. शं. रेगे, बाळ सामंत, अरूण टिकेकर, रमेश शिंदे (बाबासाहेब आंबेडकर व सत्यशोधक समाजावरील साहित्य) सुहास सोनवणे यांचे ग्रंथसंग्रहही नावाजलेले आणि जाणीपूर्वक जोपासलेले आहेत.

**४) आगळी-वेगळी पुस्तके-**

कापड, चामडे, प्लॅस्टिक यांसारख्या वेगळ्या माध्यमांवर छापलेली, वेगळ्या आकाराची किंवा आशय व्यक्त करणारा आकार दिलेली पुस्तकेही वैशिष्ट्यपूर्ण आणि म्हणूनच संग्राह्य आहेत. अलीकडे मुलांसाठी निघालेली आकर्षक रंगाची कापडी पुस्तके तसेच प्लॅस्टिकची पुस्तके (Bathbooks- मुलांना आंघोळीच्या वेळी देता येतील अशी पुस्तके) तसेच गाडीच्या आकाराची चाकं असलेली नि त्या अनुषंगाने गोष्टी असलेली पुस्तके मुलांना 'खेळ' म्हणूनही उपयुक्त आहेत.

आकाराने अगदी चिमुकली पुस्तके अनेकदा बाजारात विक्रीला येतात. ढवळे प्रकाशनाने १९७९ मध्ये काढलेले लहानसे मनाच्या श्लोकांचे पुस्तक तसेच 'The little webster's Dictionary' ही पुस्तके अशा आगळ्या-वेगळ्या पुस्तकांत मोडतील. अलीकडेच नेहरू सेंटरमधील मुद्रणविषयक प्रदर्शनात बडोद्याच्या जन्नरकर व जगदाळे यांनी मुद्रित केलेली २० मि.मि. x १७ मि.मि. आकाराची भगवद्गीतेची प्रत ठेवण्यात आली होती. ही प्रत चांदीच्या सुबक डबीत ठेवून या डबीच्या झाकणावर बहिर्गोल भिंग बसविण्यात आले आहे. अशी आगळी-वेगळी पुस्तके ग्रंथालयाच्या संग्रही असणे आवश्यक आहे. इंग्रजीमधील एक पंख्यांविषीचे पंख्याच्या आकाराचे जपानमध्ये मुद्रित झालेले पुस्तक ना. दा. ठा. विद्यापीठ ग्रंथलयाच्या संग्रहात आहे. मध्यंतरी इंग्रजीतील 'सुगंध आणि अत्तरे या विषयावरील पुस्तक पाहण्यात आले. या पुस्तकाच्या वेष्टनाच्या आतील बाजुला विविध सुगंधित कागदांचे नमुने चिकटविलेले आहेत.

या वैविध्याने नटलेल्या आणि वैचित्र्यपूर्ण पुस्तकांप्रमाणेच निरनिराळ्या लिप्यांतील मराठी पुस्तकेही लक्षात घेण्यासारखी आहेत. रोमन, मोडी, कानडी इत्यादी लिप्यांत मुद्रित झालेल्या मराठी पुस्तकांचा यात अंतर्भाव करावा लागेल मोडीतील बळवंतराव चिटणीसकृत 'छत्रपती प्रतापसिंह यांची लेखी तसबीर' रोमन लिपीतील फादर स्टीफन्सचे 'खिस्तपुराण' आणि अगदी अलीकडचे कानडी भाषेतील पण देवनागरी लिपीतले मंदाकिनी कट्टी यांचे 'आंनदी-गोपाळ' (आनंदी-गोपाळ चे कानडी भाषांतर) यांसारखी पुस्तकेही अशा आगळ्या-वेगळ्या पुस्तकांत जमा होतील.

कित्येकदा एखाद्या चर्चासत्रात उत्तम निबंध वाचले जातात; ते एकत्रित केले जातात. एखाद्या पुस्तक-प्रदर्शनात चांगली पुस्तिका निघते. अशा प्रकाशनांच्या दोनशे-अडीचशे प्रतीचे बाहेर पडतात. या प्रकाशनांना Grey literature (राखी प्रकाशने) म्हणून संबोधले जाते. अशी प्रकाशने जमवून ग्रंथलयातही वेगळा संग्रह केल्यास संशोधकांना ती उपयुक्त ठरतात. ही पुस्तके लवकरच दुर्मिळ होतात.

दुर्मिळ पुस्तकांची मूल्यनिश्चिती ही नेहमीच वादाचा विषय ठरलेली आहे. येथे किंमत आणि मूल्य यांमधील भेद लक्षात घेणेही योग्य ठरेल. वस्तूंचे मूल्य हे सापेक्ष असेल. दुर्मिळ पुस्तकांबाबत जाणकार व्यक्तीच त्यांचे मूल्यमापन योग्य रीतीने करू शकेल वर उल्लेखिलेल्या काळ, जगातील उपलब्धता, पुस्तकाचे अनन्यसाधारण वैशिष्ट्य व वैचित्र्य वगैरे गोष्टी मूल्यनिश्चिती करताना लक्षात ठेवाव्या लागतील. दुर्मिळ पुस्तकांविषयी अधिक जाणकारी हवी असेल तर अ. का. प्रियोळकारांचे 'मराठी ग्रंथाचे आदर्श संग्रहालय' स. गं. मालशे यांचे 'आगळ-वेगळे' व अविनाश सहस्त्रबुद्धे यांचं 'दुर्मिळ अक्षरधन' ही पुस्तकं जरूर वाचायला हवी.

आज बऱ्याच ग्रंथालयांमधून दुर्मिळ पुस्तकं उपलब्ध आहेत. पण त्यांच्या संरक्षणासाठी व जपणुकीसाठी पैशांची वेगळी तरतूद मात्र केली जात नाही. ही पुस्तके अनेकदा खिळखिळी झाल्यामुळे आणि किडे-वाळवी यांच्या भक्ष्यस्थानी पडल्यामुळे दुर्लक्षित राहून रद्दीत काढली जातात. कगद हे इतर माध्यमांपेक्षा अधिक टिकाऊ माध्यम असले तरी नाशवंत आहे. त्यातही १८ व्या शतकातील कागद चिंध्यांपासून बनविलेला असल्याने अधिक टिकाऊ होता. १९ व्या शतकातील औद्योगिक क्रांतीनंतर तो लाकडाचा भुसा, चौथा यांपासून यंत्रावर बनविला जाऊ लागला. हा कागद अधिक नाशवंत असून त्यावर हवेतील आम्लांची प्रक्रिया जलद होते. म्हणूनच १८ व्या शतकातील पुस्तकांची अवस्था १९ व्या शतकातील पुस्तकांपेक्षा चांगली आढळते. दुर्मिळ पुस्तकांच्या मूल्यनिश्चितीत पुस्तकाच्या कागदाची प्रत व संग्राहकाने त्याच्या जपणुकीसाठी घेतलेली काळजीही लक्षात घ्यावी

लागेल. मुंबई विद्यापीठ ग्रंथालय आपल्या दुर्मिळ ग्रंथांचा व इतर वस्तूंचा (लोकाग्रणींचा पत्रव्यवहार त्यांच्याजवळील वस्तू इत्यादी) खजिना वर्षातून एकदा सर्वांसाठी खुला ठेवते. अशा प्रदर्शनांतूनही जिज्ञासूंना दुर्मिळ ग्रंथविषयक माहिती आणि या ग्रंथांच्या जपणुकीचा वस्तुपाठच मिळतो. वातानुकूलित ठिकाणी दुर्मिळ ग्रंथ ठेवल्यास ते अधिक काळ टिकतील. परंतु सर्वच ग्रंथालयांना सतत वातानुकूलित वातावरणात ग्रंथ ठेवणे परवडण्यासारखे नाही.

काही वर्षांपूर्वी लायब्ररी ऑफ कॉंग्रेस आपल्या मायक्रोफिल्मिंगच्या प्रकल्पाखाली शहरातील नामांकित ग्रंथालयांना आपल्या दुर्मिळ ग्रंथाच्या सूक्ष्मपत्रे (मायक्रोफिशेस) करून देत होती. या ग्रंथालयांच्या पदधिकाऱ्यांनी या बाबतीत काही गोष्टींचा विचार करणे आवश्यक वाटते. आज दुर्मिळ ग्रंथाच्या संरक्षणामागे पुस्तकी किमान ३० ते ३५ रुपये खर्च येतो. अशा परिस्थितीत आजवर मायक्रोफिल्मिंग झालेल्या ग्रंथांची अवस्था कशी आहे? किती ग्रंथ मायक्रोफिल्मिंग करताना पत्रावळ्या झाले आहेत? आज भारताच्या हवमानात मायक्रोफिल्मस किती काळ टिकतील आणि त्या तुलनेने अमेरिकेत त्या किती टिकतील ? या गोष्टीचा विचार आवश्यक ठरतो.

दुर्मिळ पुस्तकांच्या संग्रहाबाबत एक गोष्ट सुचवावीशी वाटते. ग्रंथसंग्राहकांनी तसेच ग्रंथालयांनी एखाद्या विषयाशी निगडीत किंवा प्रकाराशी निगडित संग्रहावर भर दिला तर संग्रहाची वाढ अधिक पद्धतशीरपणे होईल. एखाद्या ग्रंथालयात विषय संबंध्द महत्वाच्या ग्रंथाच्या सर्वच प्रती असणेही कित्येकदा आवश्यक ठरते संशोधकांनाही ते सोयिस्कर होईल. ग्रंथालयांनी दुर्मिळ पुस्तके आभूषणाप्रमाणे केवळ शोभेची साधने म्हणून न वापरता त्यांच्या जतन आणि संरक्षणासाठी वेळीच योग्य ती उपाययोजना करणे आवश्यक आहे. प्रत्येक ग्रंथालयाने आपल्याकडील दुर्मिळ पुस्तकांची वेगळी सूची ठेवणे अगत्याचे आहे. एका शहरातील दुर्मिळ ग्रंथसंग्रही असलेल्या ग्रंथालयाच्या ग्रंथपालांनी आपल्याकडील दुर्मिळ पुस्तकांची माहिती पुरविल्यास वाचकांना मार्गदर्शन देणे सोयीचे होईल. पुस्तकाच्या उपलब्धीविषयी जाणकारी मिळेल. या ग्रंथपालांना त्यामुळे यापुढील संग्रहाचे धोरण ठरवता येईल. या गोष्टींची काळजी योग्य वेळी घेतली तरच आपलं दुर्मिळ अक्षरधन आपल्याकडे राहील. नाहीतर आपल्याच देशातील दुर्मिळ पुस्तकं शोधायलाही आपल्याला अमेरिकेत जावं लागेल!

**सुषमा पौडवाल**
१२ ब/शततारका,
आर.टी.ओ. समोर, चार बंगला,
अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०० ०५६
दूरध्वनी : २६३६०७६५
भ्रमणध्वनी. ९२२३४५००५६

**जोशी बेडेकर महाविद्यालय**
पुढील परिषद
**बायोएथिक्स्**
**अर्थात**
**जैवनीती**
या विषयावर
ता. २४-२५ जानेवारी २००७

चित्रपालवी

# कलेच्या शिबिराला पाठवताना

*कलेची शिबीरे हल्ली गल्लोगल्ली होतात. सगळीच शिबीरे दर्जेदार असतात असे नाही. या संबंधात आमच्या डॉ. बेडेकर विद्या मंदिराच्या कलाध्यापिका सौ. मंजिरी दांडेकर यांनी केलेले मार्गदर्शन - संपादक*

वार्षिक परीक्षा संपल्या की जिकडे तिकडे भूछत्र्यांसारखी शिबिरे आयोजित केली जातात. उत्साही पालक मुलांना मोकळे सोडण्यापेक्षा कुठेतरी अडकवून टाकू म्हणून कला शिबिरात घालतात. आता त्यांना कलेचे महत्त्व पटते (अडकवून ठेवण्यापुरते) कारण काय तर त्या मुलांचा सर्वांगीण विकास व्हावयास हवा म्हणून. पण मला एक समजत नाही की असा ८-१० दिवसांत जादू केल्यासारखा व्यक्तिमत्त्व विकास होईल का ? वास्तविक व्यक्तिमत्त्व ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. मग प्रश्न असा पडतो की या ८-१० दिवसांतच मुलाने चित्रे काढून, मातीची खेळणी करून आपल्या विकास साधायचा कसा? एरवीही त्याला तशी संधी द्या आणि मग जादू बघा. ही शिबिरं आयोजित केली जातात, पालक उत्साहने भरमसाठ फी देऊन मुलांना शिबिरांना पाठवतात पण त्या शिबिरात कोणत्या विषयाचे मार्गदर्शन मिळेल, शिबिरातून नेमकं काय मिळेल ? मार्गदर्शक कोण? त्यांचा त्या विषयाचा अभ्यास, अनुभव याचा काही एक विचार पालक करीत नाहीत. अभ्यासाच्या रगाड्यात विद्यार्थ्यांना या विषयाकडे लक्ष द्यायला फुरसत मिळत नाही तेव्हा तो (कलेचा) अभ्यास सुटीत मुलांनी पूर्ण करावा अशी पालकांची अपेक्षा ! हे पालक स्वत:च्या कल्पना घेऊन पाल्यांना येथे पाठवतात. त्यापेक्षा पालकांनी मुलांनाही विश्वासात घेऊन शिबिरात पाठवावे. म्हणजे एखाद्या विषयाची आवड निर्माण व्हावी असं वाटत असेल तर त्या कार्यशाळेत गेल्याने तुझा काय फायदा होईल हे समजावून सांगावे. त्या कार्यशाळेत जे शिकवले जाते त्याचा उपयोग मनोरंजनात्मक पद्धतीतून अभ्यासात्मक पद्धतीकडे नेण्यासाठी पालकांनीही हातभार लावावा. काही पालकांचे म्हणणे असे आहे की, कलेच्या क्लासला पाठवल्यावर सहा महिन्यांत मूल शिकून तरबेज झाले पाहिजे. पण आठवड्यातून दोन दिवस म्हणजे महिन्यातून आठ दिवस याप्रमाणे सहा महिन्यांचे ४८ दिवस (रोज २ तास प्रमाणे ९६ तास) या एवढ्या कालावधीत मुलाने एखाद्या कलेत तरबेज व्हावे ही अपेक्षाच मुळी चुकीची आहे. कारण कला ही तपश्चर्या आहे. त्यात सातत्य हवे, तरच कुशलता प्राप्त होईल.

सध्या चित्र, शिल्प, कला कार्यशाळांच्या जाहिरातीतून त्याचं स्वरुप स्पष्ट होतं. आमच्या क्लासमध्ये ट्यूशन फी नाही पण ज्याचं प्रात्यक्षिक दाखवायचं ते तुम्हाला करावसं वाटलं तर साहित्याची फी अमूक अमूक म्हणजे सूज्ञ पालकांनी हे लक्षात घ्यावे की त्या साहित्याच्या फीमध्येच ट्यूशन फी आली. दुसरं असं की या कार्यशाळांना पाठवताना पालक मुलांच्या वयाचा विचार करीत नाहीत. पॉट रीटिंग, बांधणी अशा कार्यशाळा या ८ वी ते १० वी साठी ठीक पण काही २ री ते चौथीतील लहान मुलेही येथे पाठवली जातात. म्हणजे त्यांनी हे शिकणे अयोग्य आहे असे नव्हे, पण त्यांचा पाया आधी पक्का व्हायला हवा. म्हणजे चित्र नीट काढता येणं, रंगवता येणे, रंगसंगती साधणं हे आलं की मूल कुठलंही पेंटींग करायला तयार होईल. काही ठिकाणी नमुन्याबरहुकूम चित्रे काढून घेतली जातात. त्यातून मुले चांगली नकलाकार बनतील पण त्यांना स्वत:ला चित्र काढायला सांगितल्यावर

तो बिघडतील. कधी कधी वाटतं ही शिबिरं म्हणजे पैसे कमावण्याचे कारखाने झाले आहेत. अर्थात याला अपवाद आहेतच.

शिबिरात जाण्यासाठी पालक भरमसाठ पैसे खर्च करतात. तेवढ्या पैशात आपल्या घरातला एक कोपरा मुलांसाठी ठेवा, अगदी खटपट घरासारखा. तेथे त्यांनी काय वाटेल ते करावे. मॉडेलिंग क्ले द्यावी, त्यातून मुले नवनवीन आकार करतात. त्यातून त्यांना टाकावूतून काही निर्माण करता येते हे समजते. प्रत्येक गोष्टीतले सौंदर्य आणि त्याची उपयुक्तता टिपायला किंवा त्या दृष्टीने विचार करायला मुले शिकतात. तेव्हा शिबिराला पाठवताना पालकांनी केवळ मोठमोठ्या नावांना भुलून न जाता खरोखरच आपल्या पाल्याला काय शिकता येईल याचा विचार करूनच शिबिराला पाठवावे.

सौ. मंजिरी दांडेकर
मधु-मिलिंद बिल्डिंग, घंटाळी रोड
नौपाडा, ठाणे (प) ४००६०१.
दूरध्वनी क्रमांक : २५४१ ४५३९

दि
शा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

## दुर्मिळ ग्रंथ कशास म्हणावे ?

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने मराठी ग्रंथसूची प्रसिद्ध व्हावी अशी ग्रंथसंग्रहालयाची इच्छा होती. याकरिता डॉ. पु. म. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली ग्रंथालयशास्त्रविशारदांची एक खास ग्रंथसूचिसमिती नेमण्यात आली. संग्रहालयाच्या सुवर्णमहोत्सवीदिनी ग्रंथसूची प्रसिद्ध करणे शक्य नसल्याने निदान दुर्मिळ ग्रंथांची यादी तरी त्या वेळी प्रसिद्ध करावी, अशी एक सूचना मुंबई विद्यापीठाचे मुख्य ग्रंथपाल प्रा. मार्शल यांनी पुढे आणली आणि त्यातून दुर्मिळ ग्रंथांची नामावली तयार झाली. तीच पुढे 'मराठा दोला मुद्रिते' या नावाने प्रसिद्धीस आली. प्रा. अ. का. प्रियोळकर यांनी ही सूची तयार केली. (१९४९).

या सूचीच्या पहिल्या आवृत्तीला प्रा. प्रियोळकरांनी प्रस्तावना लिहिली व 'दुर्मिळ ग्रंथ कशास म्हणावे ?' या प्रश्नाची चर्चा केली. सूचीची दुसरी आवृत्ती १९६१ साली प्रा. सुरेंद्र गावस्कर यांनी संपादित केली. तिसरी आवृत्ती प्रा. डॉ. गंगाधर मोरजे यांनी संपादित केली आहे.

प्रा. प्रियोळकरांची प्रस्तावना दुसऱ्या आवृतीत परिशिष्ट म्हणून टाकण्यात आली आहे. १९४९ साली लिहिलेली ही प्रस्तावना आज ५० वर्षानंतरही तितकीच महत्वाची आहे. 'दुर्मिळ ग्रंथ कशास म्हणावे?' हा प्रश्न ग्रंथपालनाच्या व्यवसायात असणाऱ्या सर्वच व्यावसायिकांना नेहमी भेडसावत असतो. अजूनही ताजा असणारा हा दुर्मिळ ग्रंथावरील ५० वर्षापूर्वीचा विचारांना चालना देणारा लेख संक्षिप्त स्वरुपात देत आहोत.

प्रा. अ. का. प्रियोळकर

संदर्भ - मराठी दोलामुद्रिते (१९४९)

पुस्तक परिचय

# प्रिय दीदीस

'प्रिय दीदीस', हा अशोक चिटणीस यांचा काहीसा चाकोरी बाहेरचा म्हणावा असा कविता संग्रह आपल्या ह्यात नसणाऱ्या दीदीशी (कै. मुग्धा) तिची धाकटी बहीण (सौ. श्रद्धा) बोलते आहे. संवाद साधते आहे अशा कल्पनेतून या कविता लिहिल्या गेलेल्या असल्याने भावनोत्कटतेचा हृदयस्पर्शी अनुभव कविता वाचताना येतो. या एकतर्फी संवादात मुग्धा, श्रद्धा बहीणी तर आहेतच, पण त्याहूनही जिवलग मैत्रिणी अधिक आहेत. आपल्या दोन मुलींमधील जीवाभावाचे मैत्र वडिलांच्या मनात येणे व त्याने उत्कट शब्दरूप घेणे असा आशय असणारा हा मराठी साहित्यातील पहिलाच प्रयोग असावा. कविता गद्यात असल्या तरी एक आंतरिक लय या कवितांना आहे.

काव्य संग्रहाच्या प्रस्तावनेत कवी अशोक चिटणीस यांनी मांडलेला मुद्दाही महत्त्वाचा आहे. एकीकडे कुटुंब संस्था विघटित होत असताना श्रद्धा, मुग्धा आपल्या प्रेमाने एकमेकींना समजावून घेत आपले वेगळेपण, मैत्रीच नाते जोपासत आहेत.

माणसं कुठेही गेली, माणसांनी कितीही शोध लावले, प्रगती केली तरी उबदार कुटुंबापेक्षा मोठ असं काही सापडू शकणार नाही, असं श्रद्धा एका कवितेत म्हणजे तर 'तेव्हा तूच दिसतेस' (पृ.४८) या कवितेत ती म्हणते,

जाणवते स्पंदन तुझ्या
तुडुंब प्रेममय हृदयाचे
तुझाच मी करते
सतत मग विचार

'तुझ्या चिरंतन सुखासाठी' या कवितेतील पहिल्याच ओळीत 'माझ्या परमप्रिय मैत्रिणी' असे म्हणत मुधाच्या चिरंतन सुखासाठी शुभ चिंतन व्यक्त करते (पृ. ३८-३९) भावनेतील उत्कटतेचा ही कविता उत्तम नमुनाच आहे.

या काव्यसंग्रहाची मध्यवर्ती कल्पना (आपल्या दोन मुली एकमेकींच्या परम प्रिय मैत्रिणी आहेत) अतिशय हृदयस्पर्शी आहे. 'तुझ्या माझ्यातील प्रेम ढळणार नाही (पृ. ४०) हा आशय सर्व कवितात असल्याने क्वचित कविता एकसुरी' वाटतील अशा आहेत. तरीही सर्व कवितांचा एक स्वतंत्र मूड समजावून घेतला तर हाच आशय कसा हृदयस्पर्शी होतो. पृ.२० वरील 'तुझ्या सारखी बहिण असणे ही देखील अशीच स्पर्शून जाणारी कविता आहे. ''तुझ्या सारखी बहीण म्हणजे'' सारे एकत्रित अनुभवणे ही शेवटची ओळ कै. मुग्धाचे संपन्न व्यक्तिमत्व, लोभस स्वभाव यांची आठवण करुन देणारी आहे.

यातील मुग्धा व श्रद्धा या दोन बहिणी कोण असा प्रश्न वाचकाच्या मनात स्वाभाविकच उमटेल पण प्रस्तावनेत परिशिष्टात याचे उत्तर आहे. किंबहुन कवी फ.मु.शिंदे यांचे मनोगत, शेवटची परिशिष्टे या काव्यसंग्रहाचे महत्त्व वाढविणारी आहेत. मुखपृष्ठावर एकमेकींशी संवाद साधणाऱ्या श्रद्धा, मुग्धा, त्यांच्या चेहऱ्यावरील भाव ही मुखपृष्ठकार अनिल दाभाडे यांची दाद द्यावी अशी कल्पना आहे. परचुरे प्रकाशनचे आप्पा व नरेन परचुरे यांनी पुस्तकाची निर्मितीही सुरेख केली आहे. संवेदन क्षम मन असणारांनी अवश्य वाचावा असा हा ३४ कवितांचा संग्रह आहे.

'प्रिय दीदीस'-चिटणीस, अशोक
मुंबई, परचुरे प्रकाशन, २००६
पृ.७१ मूल्य ७५ रु.

मोहन पाठक

पुस्तक परिचय

# गीतांबरी

ज्येष्ठ साहित्यिक श्री. भा. द. खेर यांचे राजेन्द्र खेर हे सुपुत्र, त्यांच्या 'देह झाला चंदनाचा' या प. पू. पांडुरंग शास्त्री आठवले यांच्या जीवनावरील कादंबरीचे रसिकांनी उत्स्फूर्त स्वागत केले. त्यानंतरची ही भगवद्गीतेवरील कादंबरी. 'देह झाला...' ही कादंबरी गुजराथी, हिंदी, इंग्रजीतून प्रकाशित होत आहे. 'गीतांबरीचेही' इंग्रजी अनुवादाचे काम सुरू आहे.

या पुस्तकातील 'शंखनाद' मध्ये ते म्हणतात प्रस्तुत कादंबरीची मूळ कल्पना माझ्या वडिलांची आहे. गीतेवर कादंबरी ? तत्त्वज्ञान कादंबरीच्या स्वरूपात ? प्रत्येकजण अशीच प्रतिक्रिया व्यक्त करीत होता. सर्वांना ही अशक्य गोष्ट वाटत होती.

वडिलांनी संभाषण स्वरूपात गीता लिहिली. मी म्हटलं 'हे केवळ परंपरागत संभाषण झालं. कादंबरीचं स्वरूप अधिक दृगोचर केलं तर ?' वडिल म्हणाले, 'मग तू लिही, माझं आता वय झालं, ते आव्हान लेखकाने स्वीकारले आणि तीन-चार वर्षात 'गीतांबरी' सिद्ध केली.

'गीतांबरी' ही कादंबरी केवळ दोन तासांच्या घडामोडींवर आधारलेली आहे. एवढा कमी अवधी कादंबरीच्या स्वरुपात रंगवणं हे फार मोठं आव्हान होतं. ते आव्हान लेखकाने समर्थपणे पेलले आहे.

ऐन रणांगणावर गीता कशी काय सांगितली असेल? गीता मागाहून महाभारतात घुसडली तर नसेल ना ? गीता सांगणारा कृष्ण आणि गोकुळातला कृष्ण हे वेगळे होते, श्रीकृष्ण तीन होते असे अनेक आक्षेप देशी विदेशी टीकाकार गीतेच्या प्रासंगिक उपदेशावर टीका करताना घेतात. लेखक म्हणतो सूक्ष्मपणानं 'गीतांबरी' कादंबरी वाचल्यानंतर हे सारे आक्षेप गळून पडतील असा मला विश्वास वाटतो. कारण श्रीकृष्णाचं जीवन त्याला अभिप्रेत असलेली धर्मसंस्थापना, त्या हेतूनेच त्याने दूरदर्शीपणाने आरंभिलेले कार्य आणि या सर्वांचा कळस म्हणजे त्याने सांगितलेले चिरंतन तत्त्वज्ञान या सर्वांचा उहापोह या कादंबरीत केला आहे.

मी गीतेचा भाष्यकार नाही किंवा संस्कृत पंडितही नाही. कलावंत कादंबरीकाराची भूमिका पार पाडण्याचा मी केवळ प्रयत्न केला आहे. ही लेखकाची भूमिका आहे. गीता प्रत्यक्षात युद्धभूमीवर सांगितली गेली. तथापि कादंबरीच्या दृष्टीने यात थोडाफार बदल लेखकाने केला आहे. एकाच ठिकाणी त्याचं संभाषण न दाखवता ते कुरूक्षेत्रावर अन्य ठिकाणीही त्यांच संभाषण झालेलं प्रस्तुत कादंबरीत दाखवलं आहे.

श्रीकृष्णाला अभिप्रेत असलेला धर्म म्हणजे 'रिलिजन' नव्हे. प्रस्तुत कादंबरीत धर्माची व्याख्या ठिकठिकाणी आलेलीच आहे. अर्जुनाने लढाईला उभं रहावं एवढ्याच उद्देशाने गीता भगवंताने सांगितलेली नाही. तर ती ऐहिक आणि पारलौकिक उत्कर्ष साधण्यासाठी सांगितली आहे, अखिल मानवाच्या उत्थानासाठी सांगितली आहे. कोणत्याही युगात त्या त्या संस्कृतीला सर्वांगिण उत्कर्ष साधण्यासाठी गीतेचाच आधार घ्यावा लागेल कारण गीतेचं तत्त्वज्ञान चिरंतन सार्वकालिक स्वरुपाचं आहे.

कादंबरीच्या मुखपृष्ठावर व मलपृष्ठावरही कुरूक्षेत्रावर समोरासमोर सज्ज उभ्या असलेल्या पांडवांच्या ७ अक्षौहिणी व कौरवांच्या ११ अक्षौहिणी सैन्याचे चित्र

आहे. महाभारताच्या युद्धात शंखनादाला व प्रत्येकाच्या शंखाच्या नावासहित वर्णनाला प्रामुख्याने प्राधान्य दिले गेले आहे म्हणून मुखपृष्ठावर दाखवलेला शंख आपल्या मनात कादंबरी वाचायला घेतांना आधीच शंखनादाची पार्श्वभूमी तयार करतो.

पुस्तकात अनुक्रमणिका नाही. एकूण 'तेवीस सुदर्शने' (प्रकरणे) यात आहेत. प्रत्येक सुदर्शनावर (प्रकरणावर) श्रीकृष्णार्जुन रथाचे चित्र आहे. शेवटी 'संदर्भ साहित्य' दिले आहे व 'गीतांबरी'तील काही वेचे संग्रहित केले आहेत. मुखपृष्ठाच्या आतील पानावर व मलपृष्ठाच्या आधीच्या पानावर मुखपृष्ठाच्या चित्राच्या पार्श्वभूमीवर गीतेतील तत्वज्ञानाच्या काही ओळी दिल्या आहेत त्या वाचकांच्या हृदयावर कायमच्या कोरल्या जाव्यात या उद्देशाने दिल्या आहेत. त्या स्तुत्य आहेत.

गितेला कादंबरीचं रूप देतांना काही निसर्ग वर्णनं आली आहेत, महालांची वर्णनं महाभारतातल्या पात्रांची व्यक्तिचित्रणं यात सहजता आली आहेत. कुरुक्षेत्रावरचं हे निसर्गवर्णन पहा - ''सूर्य किंचित वर आला होता. काही वेळापूर्वी त्याचं दुंभगल्यासारखं दिसणारं भासमान स्वरूप जाऊन तो पुन्हा एकसंघ दिसायला लागला होता, त्या सूर्यावर आक्रमण करू पाहणारे पिंगट रंगाचे मेघ आता पांगले होते. चराचराला त्याचं हेच नित्याचं रूप हवंहवंस वाटत होतं. एवढा वेळ आजूबाजूच्या वृक्षांवर दडी मारून बसलेला पक्षिगण आता स्वच्छंदीपणानं विहार करण्यासाठी बाहेर पडला होता. समोरच्या जलाशयाभोवती शुभ्र बगळ्यांच्या माळा माळल्या जात होत्या. जलाशयाच्या बाजूनं असलेल्या वृक्षवल्लरी वाऱ्याच्या मंद झुळुकीबरोबर डोलायला लागल्या होत्या. पांढऱ्या पिवळ्या रंगांची फुलपाखरं त्या वल्लरींवरून रूंजी घालत होती. एकाएकी निसर्गात हा बदल घडून आला होता. काही वेळापूर्वीचं रौद्र रूप टाकून निसर्गानं हे मोहक रूप धारण केलं होतं. या आनंदी आणि उत्साहवर्धक वातावरणात मधूनच दूरवरून ऐकू येणारे शंखांचे धीरगंभीर ध्वनी उमटत होते. परंतु त्यामुळे या वातावरणाचं पावित्र्य किमपि भंग पावत नव्हतं.''

कादंबरीत रंजकता स्वाभाविकता व वास्तवता आणण्यासाठी आलेलं हे वर्णन वाचा. ''रथ निश्चल उभा होता. दीर्घकाळ मान वळवून बोलावं लागल्यामुळे श्रीकृष्णाच्या मानेला रग लागली होती, ती गोष्ट अर्जुनाच्या ध्यानात आली. तो म्हणाला देखील ''कृष्णा, मी सरळ बसलोय, तू मात्र अवघडला असशील. रथाखाली उतरू या का ?

''श्रीकृष्ण हसला. लगेच त्यानं रथाखाली उडी मारली. अर्जुनही खाली उतरला. दूरवर पांडव पक्षाचे काही रक्षक येऊन उभे होते. अर्जुनाच्या दिव्य रथाच्या सुरक्षेचं दायित्व त्या रक्षकांवर सोपवून श्रीकृष्ण अर्जुनासह त्या वनात चालू लागला. शमी, ताल, शिंशिपा अशा वृक्षांच्या छायेखालून ते रमत गमत निघाले.

तेवढ्यात दोन उमदे अश्व दौडत आले. दोघे सैनिक पांडव पक्षाचे होते. आपापले अश्व ताल वृक्षाखाली बांधून मग अर्जुनासमोर येऊन त्यांनी त्याला आणि श्रीकृष्णाला झुकून अभिवादन केले.

''काही विशेष ?''

''युधिष्ठिर महाराजांनी आम्हाला पाठवलंय.'' सुमंत सैनिक म्हणाला, त्याचा सहकारी सुबल म्हणाला ''दोन्ही पक्षाकडील व्यूहरचना पूर्ण होत आली आहे. तरीही आपण न आल्यामुळे ते चिंतामग्न झाले आहेत.'' श्रीकृष्ण अधिकार वाणीनं म्हणाला, ''युधिष्ठिर महाराजांना सांगा की, तुम्ही मुळीचं चिंता करू नका. आम्ही थोड्याच अवधीत रणांगणावर येऊन आमचं नियोजित स्थान ग्रहण करतो.

''अरे पण कृष्णा ... रणांगणावर मी ...''

''तुझी पुढची शंका विचार पार्था ! वेळ वृथा दवडू नकोस !''

सुदर्शन तेरामध्ये महर्षी लोमहर्षण (व्यास शिष्य) पांडवाच्या शिबिरात सर्व ब्रह्मवृंद आणि इतर अधिकारी जनांच्या यथोचित स्वागताचा स्वीकार करून द्रौपदीच्या कक्षाकडे वळतात. 'त्यावेळी याज्ञसेनीनं तेव्हा चीन मधून आलेलं शुभ्र उत्तरीय परिधान केलं होतं.(पान १९०) असं वर्णन आलं आहे. त्याकाळी 'चीन' असं देशाचं नाव होतं का ? या संपूर्ण प्रकरणात महाभारत जास्त डोकावले आहे.

गीतेला कादंबरीचं रूप दिल्यामुळे यात उदा. पान १९१ वर द्रौपदीचं फणफणनं, अर्जुनानं शस्त्र खाली का टाकलं म्हणून ! मध्येच कुरूक्षेत्रावरचं वर्णन तर मध्येच हस्तीनापूरच्या राजवाड्याचं, त्यांतील राजस्त्रियांचं वर्णन अशी सरमिसळ वर्णन येतात. त्यामुळे तत्त्वज्ञानाची क्लीष्टता, रुक्षता, गहनता कमी होऊन त्यात सहज स्वाभाविकता, रंजकता, रोचकता आली आहे.

गीतेच्या तत्त्वज्ञानाला महाभारताची पार्श्वभूमी व त्याला कादंबरीचा साज त्यामुळे 'गीतांबरी' उत्कृष्ट कादंबरी झाली आहे. कादंबरीच्या स्वरुपात गीता सांगण्याचा हा बहुधा पहिलाच प्रयत्न असावा व तो यशस्वी झाला आहे. वाचकांनी 'गीतांबरी' वाचून गीता तत्त्वज्ञान सुलभतेने ग्रहण करावे.

गीतांबरी - राजेंद्र खेर
पुणे, विहंग प्रकाशन, पृ. ३४४
मूल्य रु. १६०/- फक्त

**आशा भिडे**
बी/९ विजय अपार्टमेंट,
'आराधना' टॉकीजजवळ, ठाणे (प.)
दूरध्वनी - २५४१०१४०

## नाम

दुःख आणि सुख देहाला होतात, त्रास आणि यातना मनाला होतात, कष्ट आणि ताप देहाला होतो, म्हणजे हा देह म्हणजेच 'मी' असतो, पण तसा तो असतो काय ? देह पडला की हे सर्व कुठे जातं ? मग देहानंतर जर तो त्रास उरत नसेल तर देह असताना तरी असतो हा भ्रम नाही काय?

प्रत्येकालाच आपले प्रारब्ध बरोबर घेऊन यावे लागते. देहाचे भोग हे भोगूनच संपवायचे असतात. ते शांतपणे संपवणेच इष्ट. नाही संपवले तर ते उरतातच व पुन्हा भोगावेच लागतात, मग संपवूनच का टाकू नये? प्रारब्ध कोणालाच बदलता येत नाही. ते स्वीकारावेच लागते. देहाचा त्रास देहाला सहन करू द्यावा, प्रपंचाचा त्रास होणारच, तो स्वीकारून, मात्र त्यापासून अलिप्त राहून नामस्मरणात राहायचे.

नामस्मरणाची ताकद मोठी बिलक्षण आहे. सर्वच संतांनी नामस्मरणासारख्या उपायाचा गौरव केला आहे. कलियुगात माणसाला हेच एकमेव साधन आहे, असं संतांचं सांगणं आहे. कोणत्याही संताचे चरित्र वाचा. नामस्मरण हे किती महत्त्वाचं आहे, हेच विशद केलेलं सापडेल. नामस्मरणाचं महत्त्व जर नीट लक्षात घ्यायचं असेल, तर श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांचं चरित्र वाचा. प्रा. बेलसरेंनी लिहिलं आहे. याच प्रा. बेलसरें च्या इतरही पुस्तकांतून नामाचे महत्त्व फार उत्तमरित्या आले आहे.

नाम दोन प्रकारचे असते. निर्बीज व सबीज. सद्गुरु देतात ते सबीज. त्यात शक्ती असते, पण आपल्याच मनाने घेतलेल्या नामाच्या प्रभावातून सद्गुरु भेटतात, तेव्हा निर्बीज नामही कमी महत्त्वाचे नसते.

**एका साधकाच्या पत्रातून**

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर

२००६ ते ०७ या शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ १२ जून २००६ पासून झाला.

१) १ मे ते ३० मे या कालावधीत इ. १० वी साठी मार्गदर्शन वर्ग घेण्यात आले.

सौ. सविता केळकर (मुख्याध्यापिका)

सौ. अनुराधा खोपकर (उपमुख्याध्यापिका)

सौ. उषा कळमकर (पर्यवेक्षिका), आशा जोशी, सौ. अपर्णा भट, सौ. सुषमा बोऱ्हाडे, सौ. यामिनी धनगर, श्री. धोंडे, श्री. सोरटे, श्री. खैरनार, श्री. शिरापुरी, यांनी मार्गदर्शन केले.

२) २ मे ते ११ मे ०६ या कालावधित आपल्या शाळेतील श्री. धोंडे, सौ. लिमये, सौ. वाघ, आणि आशा जोशी यांनी माध्यमिक अध्यापक वरिष्ठ वेतनश्रेणी, सेवांतर्गत प्रशिक्षण, उल्हासनगर येथे पूर्ण केले.

३) ४ मे ते १० मे या कालावधीत कु. आशालता लोखंडे यांनी गाईडचे व १५ मे ते २२ मे या कालावधीत श्री. प्रकाश पांचाळ यांनी स्काऊटचे प्रगत प्रशिक्षण, भोर (पुणे-जिल्हा) येथे पूर्ण केले.

४) २२ मे ते ३० मे ०६ या कालावधीत इ. ५ वी च्या नवीन अभ्यासक्रमावर आधारित प्रशिक्षण शिबीर झाले. त्यांत सौ. मृण्मयी धंवा सहभागी झाल्या होत्या.

५) २३ जून ०६ रोजी शिक्षक सभा झाली यांत शिक्षक प्रतिनिधी म्हणून सौ. भट व कार्यालयीन प्रतिनिधी म्हणून श्री. दे. च. गवई यांची निवड करण्यात आली.

६) २३ जून ०६ रोजी माध्यमिक शिष्यवृत्तीचा निकाल लागला. यांत कु. अद्वैत संजय इनामदार याला शिष्यवृत्ती मिळाली. त्याला एकूण २५४ गुण मिळाले **तो जिल्ह्यात १५वा आला.**

शिष्यवृत्तीसाठी एकूण ४७ विद्यार्थी बसले होते. त्यातील २९ विद्यार्थी पास झाले. **निकाल ६२% लागला.** मार्गदर्शक शिक्षिका- आशा जोशी.

७) २६ जून ०६ रोजी शालान्त परीक्षेचा निकाल लागला. शाळेचा निकाल ९७.३४ टक्के लागला. तीन विद्यार्थिनी गुणवत्ता यादीत चमकल्या.

गुणानुक्रमे शाळेतील पहिले १० विद्यार्थी खालील प्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपर्णा केशव पाटील | ७०६/७५० पैकी | ९४.१३ (बोर्डात ८ वी) |
| २. | अनुश्री प्रकाश गोडबोले | ६९८ | ९३.०६(१६वी) |
| ३. | स्मिता रमेश कोलते | ६९६ | ९२.८०(१८ वी) |
| ४. | रेणुका मिलींद पेंडसे | ६८७ | ९१.६० |
| ४. | सागर संजय चांदे | ६८७ | ९१.६० |
| ५. | अनुराधा गिरीश ओगले | ६८५ | ९१.३३ |
| ६. | भुषण उदय तासकर | ६८४ | ९१.२० |
| ७. | सागर वसंत धावडे | ६७९ | ९०.५३ |
| ८. | गार्गी सतीश मुणगेकर | ६७७ | ९०.२६ |
| ९. | राहूल शांताराम डोळस | ६७७ | ८९.८७ |
| १०. | मयुरी शरद राणे | ६६७ | ८८.९३ |

विशेष श्रेणी - ८४ विद्यार्थी

प्रथम श्रेणी - ११२ विद्यार्थी

द्वितीय श्रेणी - ७५ विद्यार्थी

तृतीय श्रेणी २२ विद्यार्थी

**विषयातील पहिले**

१) मराठी - सागर वसंत धावडे - ८९/१००

२) हिन्दी - दक्षता अशोक कदम - ८४/१००

३) संस्कृत - ऋचा मुकुंद गाडगीळ, शलाका गिरीश आपटे, कल्पेश अनिल झुंझारराव } ९८/१००

४) इंग्रजी - अपर्णा केशव पाटील, अनुश्री प्रकाश गोडबोले, भूषण उदय तासकर } ९९/१००

५) गणित - अपर्णा केशव पाटील, रेणुका मिलींद पेंडसे, भुषण उदय तासकर } १४८/१५०

विज्ञान - गार्गी सतीश मुणगेकर १४८/१५०

समाजशास्त्र - राहूल शांताराम डोळस १४५/१५०

८) २४ जून ०६ रोजी, २००६-०७ ह्या शैक्षणिक वर्षासाठी शिक्षक-पालक संघाची स्थापना झाली. सरकारी परिपत्रकानुसार कामकाजाचा आढावा घेण्यात आला.

पालक प्रतिनिधी म्हणून पुढील पालकांची निवड करण्यात आली.

१) श्री. विकास ज्ञानेश्वर थोरात

२) सौ. प्रेरणा उदय वाडेकर

३) सौ. निकिता दिलीप चेरूणकर

४) श्री. संभाजी राजाराम म्हात्रे

९) २६ जून ०६ रोजी ठाणे शहरात व्यसन मुक्ती दिनानिमित्ताने पदयात्रा काढण्यात आली. यांत आपल्या शाळेतील ९ व च्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला तसेच श्री. गहरी व श्री. पांचाळ शिक्षकांचा सहभाग होता.

आमच्या संस्थेच्या सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळेतील महत्त्वाच्या घडामोडी

**फेब्रु. २००६ - टिळक विद्यापीठ संस्कृत परीक्षेचा निकाल**

| | | |
|---|---|---|
| परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | : | २१ |
| उत्तीर्ण झालेले विद्यार्थी | : | २० |
| विशेष प्रावीण्य प्राप्त विद्यार्थ्यांची संख्या | : | ५ |
| प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थ्यांची संख्या | : | १० |

**महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा निकालपत्र**

इ. ८ वी व ९ वी तील खालील विद्यार्थ्यांची महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा - एप्रिल २००६ साठी उत्तम गुणांनी पास होऊन निवड झाली.

| | नाव | गुण | | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १. | ओजस गोहाड | १७० | राज्यात २ री | ८ वी |
| २. | रूचा कारखानिस | १६१ | राज्यात ४ थी | ८ वी |
| ३. | विराज सिंघवी | १३८ | राज्यात २३ वा | ८ वी |
| ४. | अश्विनी पावगी | १२९ | जिल्ह्यात २ री | ८ वी |
| ५. | वृतिका शाह | १२६ | जिल्ह्यात ५ वी | ८ वी |
| ६. | आदित्य दामले | १२४ | जिल्ह्यात ७ वा | ८ वी |
| ७. | प्राची जोशी | १७६ | राज्यात २२ वी | ९ वी |
| ८. | मोनिष म्हात्रे | १७१ | राज्यात २७ वा | ९ वी |

**माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल**

फेब्रुवारी २००६ रोजी आयोजित माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत एकूण ५१ विद्यार्थी बसले होते. त्यातील ३ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली. त्यांची नावे खालील प्रमाणे -

१) तेजल प्रधान - १४ वी

२) अदित्य रानडे - २३ वा

३) अनिकेत वाहाळेकर - २३ वा

**२००५-२००६ चा बालवीर-वीरबाला परीक्षेचा निकाल**

राष्ट्रपती पुरस्कार मिळालेल्या विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे

**बालवीर**

१) चिन्मय भट

२) मिहीर देवधर

३) प्रतिक फुलसुंदर

४) प्रणव ढोके

५) गौरव ढोसर

राज्य पुरस्कार मिळालेल्या विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे

**बालवीर**

१) राजेश गोस्वामी

२) अनिष शेट्टी

३) सागर झांबरे

४) पियुष गंधेवार

५) यजूवेंद्र राव

६) विकास लोखंडे

७) विनित पितळे

८) निरज कोलगे

एप्रिल २००६ - टिळक विद्यापीठ गणित परीक्षेचा निकाल

१००% निकाल

| इ. | परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | उत्तीर्ण झालेले विद्यार्थी |
|---|---|---|
| ५वी | ३१ | ३१ |
| ६वी | २४ | २४ |
| ७वी | ०५ | ०५ |

सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे

| इ. | नाव | गुण |
|---|---|---|
| ५वी | प्रियज नायर | ९४ |
| ६वी | वृषाली प्रसादे | ९३ |
| ७वी | अपूर्वा देशपांडे | ८८ |

**मार्च २००५ ची माध्यमिक शालांत परीक्षा**

उत्तीर्ण झालेल्या मुलांचे यश

| | |
|---|---|
| परीक्षेला बसलेले विद्यार्थी - | १७५ |
| उत्तीर्ण विद्यार्थी - | १७५ |
| टक्केवारी - | १००% |
| एकूण विद्यार्थी - | १७५ |
| ९० टक्के व जास्त - | ०६ |
| ८५ ते ८९ = | ३१ |
| ७५ ते ८४ = | ५८ |
| ६० ते ७४ = | ६० |
| ४५ ते ५९ = | १८ |
| ४५ पेक्षा कमी | ०२ |
| | १७५ |

| गुणानुक्रमे पहिले दहा | | गुण |
|---|---|---|
| १. | सोनिया कारापूरकर | ६८७ |
| २. | श्री. पटवर्धन | ६८५ |
| ३. | अमेय ओक | ६७८ |
| ४. | चिन्तन सैया | ६७६ |
| ५. | अमेय भट | ६७६ |
| ६. | प्रणोती श्रीखंडे | ६७६ |
| ७. | भाग्यश्री ओक | ६७५ |
| ८. | तेजस सावंत | ६७३ |
| ९. | निमिषा चव्हाण | ६७० |
| १०. | रश्मी दोढीया | ६७० |

**विषयावार सर्वाधिक गुण**

| विषय | नाव | गुण |
|---|---|---|
| इंग्रजी | भाग्यश्री ओक | ८३ |
| संस्कृत | भाग्यश्री ओक | ९८ |
| | प्रणोती श्रीखंडे | ९८ |
| | श्री पटवर्धन | ९८ |
| | तेजस सावंत | ९८ |
| | गौरेश नाबर | ९८ |
| हिंदी | वैभव दोशी | ७६ |
| मराठी | धवल फडके | ८७ |
| | स्वप्निल खेडेकर | ८७ |
| | भाग्यश्री ओक | ८७ |
| | श्रेयस कोंडलेकर | ८७ |
| | चिन्तन सैया | ८७ |
| | कस्तुरी चव्हाण | ८७ |
| | रूची छेडा | ८७ |
| | निखिल जोशी | ८७ |
| | निमिषा चव्हाण | ८७ |
| | ऋषिका पालवणकर | ८७ |
| | अमेय ओक | ८७ |
| गणित | तेजस्विनी पाटील | १४८ |
| | चिन्तन सैया | १४८ |
| विज्ञान | तेजस सावंत | १४८ |
| | सिद्धेश शिंदे | १४८ |
| | रश्मी देढिया | १४८ |
| समाजशास्त्र | श्री पटवर्धन | १४३ |
| गणित व विज्ञान | चिन्तन सैया | २९४ |

विद्या प्रसारक मंडळाचे

**तंत्रनिकेतन**

***आयोजित***

राष्ट्रीय परिषद

**जीऑ-इन्फॉर्मेटिक्स्**

*ता. ८-९ डिसेंबर २००६*

**श्री गजानन महाराज मंदिर, झेंडा चौक, धरमपेठ, नागपूर येथे दिशाच्या लेखिका श्रीमती आशा भिडे यांनी सलग अठरा दिवस संपूर्ण केलेला 'गीता ज्ञान यज्ञ' सोहळा.**

दिनांक १९ जून २००६ पासून ६ जुलै २००६ पर्यंत सलग अठरा दिवस संध्याकाळी ५.३० ते ७.३० या कालावधीत श्री गजानन महाराज मंदिर, झेंडा चौक, धरमपेठ, नागपूर यांनी ठाण्याच्या श्रीमती आशा भिडे यांची श्रीमद् भगवद्गीतेवर प्रवचने आयोजित केली होती. ६ जुलै २००६ ला या गीता ज्ञानयज्ञाची सांगता झाली.

जीवनाच्या सर्व अंगाना स्पर्श करणारे जीवनोपयोगी असे गीतेचे तत्वज्ञान आशा भिडे यांनी अतिशय रसाळ व सोप्या भाषेत रोजच्या जीवनातील घडणाऱ्या घटना व प्रसंगांची उदाहरणे देऊन भाविक रसिक श्रोत्यांना रूचेल पचेल अशारितीने शर्करावगुंठित करून सांगून श्रोत्यांच्या मनाची पकड शेवटपर्यंत कायम ठेवली. त्यांची रसाळ व सुमधूर भाषेतील प्रवचने व प्रत्येक अध्यायावरील काव्य ऐकण्यास अठराही दिवस श्रोत्यांनी प्रचंड गर्दी केली होती. परमपूज्य श्रीमती सुफलाबाई देशमुख यांच्या उपस्थितीत मंदिरातील सभामंडपात संपूर्ण 'गीता ज्ञान यज्ञ' संपन्न झाला.

सर्व सामान्यांपर्यंत गीतेचे जीवनोपयोगी तत्त्वज्ञान पोचवणे ही आजच्या काळाची गरज आहे. बॉम्बस्फोटांपर्यंत मजल गाठलेल्या आजच्या कलियुगात तळागाळापर्यंत गीतेचे तत्त्वज्ञान नेऊन पोचवण्याची वेळ येऊन ठेपली आहे. आशा भिडे यांनी हे पवित्र कार्य हाती घेतलेले आहे. त्यांची प्रवचने मुंबईत नेहमीच चालू असतात.

सलग अठरा दिवस श्री गजानन महाराज मंदिर, धरमपेठ, नागपूर यांनी केलेला संपूर्ण गीता प्रवचनांचा बहुधा हा पहिलाच उपक्रम असावा. या उपक्रमाला भाविक श्रोत्यांनीही प्रचंड प्रतिसाद दिला. मंदिर व श्रोते दोघेही प्रशंसा व अभिनंदनास पात्र आहेत.

भक्तीने परमात्मा लाभतो हे भगवंताचे आश्वासनच मानवाला परमार्थाच्या वाटचालीला प्रवृत्त करते.

बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

***पुढील परिषद***

**आर्थिक गणित**

**दि. २६ ऑगस्ट २००६**

माहितीसाठी संपर्क - प्रा. आर. एस्. पोद्दार

गणित विभागप्रमुख, बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

***आगामी परिषद***

**नोव्हेंबर २००६**

**माहिती तंत्रज्ञान विभाग संयोजित**

**'लिनक्स, ठाणे २००६'**